मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !

महाराष्ट्र पक्षिमित्र

महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

# पक्षिमित्र

■ वर्ष – बारावे ■ अंक ३ रा ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ एप्रिल २०२२ ■ पाने –२४



## संपादक

**श्री. दिगंबर गाडगीळ**
३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक - ४२२००५
स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ चलभाष : ९८८१०७९७११

**सहाय्यक संपादक**

**श्री. किरण मोरे**, अमरावती, मो. ९९२३९१००३४
Email: kiranmorey1983@gmail.com

**श्री. अनिल माळी**, नाशिक, मो. ९८५०८१८६४४
Email: anilrmali@yahoo.co.in


## कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | **डॉ. जयंत वडतकर**, अमरावती<br>**मो. ९८२२८७५७७३** |
| कार्याध्यक्ष | - | **डॉ. राजू कसंबे**, ठाणे<br>**मो. ९००४९२४७३१** |
| संघटक | - | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**, अहमदनगर<br>**मो. ९८५०२९१३२४** |
| कार्यवाह | - | **प्रा. डॉ. गजानन वाघ**, अमरावती<br>**मो. ९८२२२०४०७०** |
| सहकार्यवाह | - | **श्री. शरद आपटे**, सांगली<br>**मो. ९८९०३८४४००** |
| सहसंघटक | - | **श्री. अनिल माळी**, नाशिक<br>**मो. ९८५०८१८६४४** |
| सदस्य | - | **प्रा. डॉ. निनाद शाह**, सोलापूर<br>**मो. ९४२२४५९९१५** |
| सदस्य | - | **श्री. किशोर गठडी**, औरंगाबाद<br>**मो. ९४२२२०२६२८** |
| सदस्य | - | **श्री. दिलीप विरखडे** (वर्धा)<br>**मो. ७७७५८८३८६१** |
| सदस्य | - | **श्री. अविनाश कुबल** (ठाणे)<br>**मो. ९३२४२३८०३१** |
| सदस्य | - | **कु. रूपाली मढवी**<br>**मो. ९८६९५५९९२२** |

## सल्लागार मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊ काटदरे | (चिपळूण) | मो. ९४२३८३१७०० |
| श्री. दिगंबर गाडगीळ | (नाशिक) | मो. ९८८१०७९७११ |
| डॉ. दिलीप यार्दी | (औरंगाबाद) | मो. ९४२२७०४२२१ |
| डॉ. अनिल पिंपळापुरे | (नागपुर) | मो. ९८८१७१३४६६ |
| श्री. बापुसाहेब भोसले | (अहमदनगर) | मो.९८२२६३३१३३ |


## संपादकीय



## महापक्षी महोत्सव


**दिगंबर गाडगीळ**
संपादक, महाराष्ट्र पक्षीमित्र अंक
dgadgil09@gmail.com


नांदूरमध्यमेश्वर येथे मार्चच्या पहिल्या आठवड्यात महापक्षी महोत्सव महाराष्ट्र पर्यटन मंडळाकडून, तेही वनविभागाच्या मदतीविना साजरा होणार असल्याची बातमी झळकल्यावर एक अशुभ शंका मनात आली, ती म्हणजे या रामसर परिसराचे पर्यटन क्षेत्र म्हणून वाट लावणार काय? पर्यटन विभागाचे लक्ष असते जास्तीत जास्त पर्यटक गोळा करण्याकडे. हे बेशिस्त पर्यटक गर्दी-गोंधळ करणार, मोठमोठ्याने संगीत वाजवणार, नेटके पक्षी निरीक्षण करण्याऐवजी बाजार भरवणार आणि त्यात या रामसर क्षेत्राला उपद्रव पोहोचविणार.

खरे म्हणजे नांदूरमध्यमेश्वर हे रामसर क्षेत्र म्हणून जाहीर झाल्यावर तेथील वैविधता राखण्याची जबाबदारी नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांवर आलेली आहे. त्यासाठी वन विभाग, जलसंपदा विभाग, महसूल विभाग यांची उच्चाधिकार समिती स्थापन होईल, अशी आशा होती; पण तशी काही हालचाल झाली नाही. विविध सरकारी खात्यात ताळमेळ फारसा असत नाही. तरीही जेव्हा एखाद्या स्थळासाठी असा ताळमेळ आवश्यक असेल तेव्हा समन्वय समिती स्थापन होणे आवश्यक होते. एक त्रुटी सांगायची झाल्यास नांदूर पक्षी अभयप्रदेशाची क्षेत्रनिश्चिती अजून झालेली नाही, हे सांगणे आवश्यक आहे.

त्यात समाधानाची बाब एवढीच की, या महोत्सवात डॉ. वडतकर, दत्ता उगावकर, सतीश गोगटे, डॉ. अनिल माळी, डॉ. कुऱ्हाडे, डॉ. डेर्ले यांसारख्या तज्ज्ञ पक्षी निरीक्षकांचा सहभाग असणार आहे. ते आवश्यक त्या सूचना करतील आणि नांदूरमध्यमेश्वर अनियंत्रित पर्यटन क्षेत्र म्हणून न होता ते उत्तम पक्षी निरीक्षण केंद्र, जैवविविधता क्षेत्र या अर्थाने विकसित होईल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

*** मुखपृष्ठ ***
महाराष्ट्रात आढळणाऱ्या काही घुबड प्रजाती
*** छायाचित्र ***
ॲड. राजमेहेर निशाणे, प्रशांत निकम,
अमेय ठाकरे, सौरभ जवंजाळ

# * अध्यक्षीय *



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

पक्षिमित्रचा मागील अंक चार दशकपूर्ती विशेषांक म्हणून प्रकाशित करण्यात आला. हा अंक सोलापूर येथे पार पडलेल्या ३४ व्या संमेलनात प्रकाशित करून काही सभासदांना संमेलनात व इतर सर्व सभासदांना नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आला. एव्हाना हा अंक सर्वांना मिळाला असेलच. हा अंक मिळाल्यानंतर अंक उत्कृष्ट व संग्राह्य झाल्याचे अनेकांनी कळविले. आपल्या प्रतिसादामुळे या अंकासाठी झालेल्या आमच्या टीमच्या श्रमाचे चीज झाले असेच म्हणावे लागेल. या अंकाच्या निर्मितीसाठी ज्या सर्वांचे योगदान लाभले त्या सर्वांचे महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे मन:पूर्वक आभार. प्रथमच १०० पानांचा आणि रंगीत छायाचित्रे आणि जाहिराती असलेल्या या अंकाच्या छपाई आणि डाकेचा खर्च धरून बराच खर्च झाला. मात्र या खर्चासाठी जाहिरातीच्या माध्यमातून अनेकांनी सहकार्य केले तसेच आपल्या काही सभासदांनी सुद्धा अंकनिधी स्वरुपात आर्थिक सहकार्य केले त्यामुळेच हा अंक तयार होऊन आपल्यापर्यंत पोहोचू शकला. या अंकाच्या निमित्ताने गेल्या ४० वर्षांतील पक्षीमित्र चळवळीचे मान्यवरांनी लिहिलेल्या लेखांच्या माध्यमातून दस्तऐवजीकरण होऊ शकले. गेल्या ४० वर्षांत झालेल्या ३३ राज्यस्तरीय संमेलनांची तसेच विदर्भ व उत्तर महाराष्ट्र विभागीय संमेलनांच्या एकूण १०२ प्रातिनिधिक छायाचित्रांना या स्मरणिकेत प्रकाशित करण्यात आले. ही छायाचित्रे संकलित करण्यासाठी केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत अनेकांनी आपल्या संग्रहातील अनेक छायाचित्रे पाठविली. त्यातील मोजकीच छायाचित्रे प्रकाशित करत आली तरी या निमित्ताने संस्थेकडे या दुर्मीळ व ऐतिहासिक छायाचित्रांचा संग्रह तयार झाला ही महत्त्वाची उपलब्धी म्हणावी लागेल. याशिवाय या अंकामध्ये संस्थेच्या विविध उपक्रमांची व उपलब्धतेची माहिती सुद्धा प्रकाशित करण्यात आली. या कामी आम्हाला अनेकांचे सहकार्य लाभले. विशेषतः अमरावती येथे अंक छपाई करण्यापूर्वीचा लेख प्राप्त करण्यासाठी पाठपुरावा, फोटो संकलनासाठी संपर्क करणे, अंकाची डिजाईन, तपासणी यासाठी मला अंकाचे सहाय्यक संपादक श्री. किरण मोरे, श्री. सौरभ जवंजाळ आणि प्रा. डॉ. गजानन वाघ यांचे सहकार्य लाभले. अंक प्रकाशित झाल्यानंतर सर्वात महत्त्वाचे आव्हान होते ते अंक डाकेने पाठविण्याचे. यासाठी श्री. सौरभ जवंजाळ यांनी तब्बल महिनाभर यासाठी परिश्रम घेतले. या अंकासाठी विविध पातळीवरून सहकार्य करणाऱ्या सर्व सभासद व हितचिंतकांचे पुनश्च आभार.

संस्थेचे मुखपत्र नियमित त्रैमासिक पक्षिमित्रचा अंक पोस्टाने काही सभासदांना मिळत नाही अशा तक्रारी येत असतात, त्यामुळेच चार दशकपूर्ती विशेषांक नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आला. मात्र तरीही पत्ता न सापडल्याने सुमारे ६२ अंक परत आले. गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने संपर्क करून अनेकांचे पत्ते दुरुस्त करून व बदलवून घेतल्यानंतरसुद्धा अंक परत आले म्हणजेच अजूनही काहींनी आपले बदललेले पत्ते संस्थेला कळविले नाहीत. त्यासाठी संस्थेकडून नव्याने प्रयत्न करण्यात येतील. आपणसुद्धा याबाबतची माहिती संस्थेस कळवावी ही विनंती.

मागील दोन वर्षातील कोरोनाच्या परिस्थितीमुळे होऊ न शकलेले ३४ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन अखेर जानेवारीच्या ८-९ तारखेला उत्साहात पार पडले. डॉ. मेतन फाउंडेशन यांचेकडून या संमेलनाची तयारी सतत एक वर्ष सुरु होती. मात्र ऐन वेळेवर लागलेल्या लॉकडाऊनमुळे दोनदा हे संमेलन स्थगित करावे लागले. मात्र इतके होऊनही आयोजकांनी निराश न होता संमेलन प्रत्यक्षात आणि मोठ्या थाटामाटात साजरे करण्याचा निश्चय केलेला असल्याने अखेर त्यांनी ते ठरविल्याप्रमाणे पार पडले. जानेवारीमध्ये संमेलन जवळ येता येता पुन्हा लॉकडाऊनची परिस्थिती निर्माण झाली होती. आयोजकांनी केलेल्या तयारीवर पाणी फेरले जाते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र एकेक दिवस मोजत संमेलनाचा दिवस उजाडला आणि आयोजकांनी मोठ्या उत्साहात संमेलन पार पाडले. नाही म्हणायला नोंदणी केलेल्या काही पक्षिमित्रांना कोरोनाच्या भीतीमुळे व स्थानिक निर्बंधांमुळे हजेरी लावता आली नाही. तरीही संमेलनास भरगच्च उपस्थिती होती.

ठरविल्याप्रमाणे पार पडले. जानेवारीमध्ये संमेलन जवळ येता येता पुन्हा लॉकडाऊनची परिस्थिती निर्माण झाली होती. आयोजकांनी केलेल्या तयारीवर पाणी फेरले जाते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र एकेक दिवस मोजत संमेलनाचा दिवस उजाडला आणि आयोजकांनी मोठ्या उत्साहात संमेलन पार पाडले. नाही म्हणायला नोंदणी केलेल्या काही पक्षिमित्रांना कोरोनाच्या भीतीमुळे व स्थानिक निर्बंधांमुळे हजेरी लावता आली नाही. तरीही संमेलनास भरगच्च उपस्थिती होती. वेळेवर काही वक्ते यांचे येणेसुद्धा रद्द झाले, तरीही संमेलनात दोन्ही दिवस भरगच्च सादरीकरणे, आणि व्याख्याने झाली. याही परिस्थितीत वेळेअभावी काही जणांना आपल्या सादरीकरणासाठी किंवा आपल्या  फिल्म दाखविण्यासाठी वेळ देता आला नाही म्हणून काही जण आयोजकांवर नाराजसुद्धा झाले. परंतु त्यांनी आयोजकांची वेळेची अडचण समजून घेणे आवश्यक होते. कोरोनाच्या सर्व नियमांचे पालन करून हे संमेलन यशस्वीपणे पार पडले यात शंकाच नाही. या संमेलनाची आणखी एक उपलब्धी म्हणजे संमेलनाच्या आधीच्या दिवशी दोन विषयावर पार पडलेल्या कार्यशाळा. यामधील पहिली कार्यशाळा ही जखमी पक्ष्यांची निगा कशी राखावी या विषयांवर तर दुसरी फोटो एडिटिंग या विषयावर आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी तज्ज्ञ वक्ते  लाभल्याने दोन्ही कार्यशाळा भरघोस प्रतिसादासह यशस्वीपणे पार पडल्यात. या कार्यशाळेसाठी त्या-त्या विषयाची आवड असणाऱ्यांनी वेगळी नोंदणी केलेली होती. ३४व्या संमेलनाचा सविस्तर अहवाल आणि काही छायाचित्रे या अंकात प्रकाशित करण्यात आली आहेत.

यापुढील ३५वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन चंद्रपूर येथे इको-प्रो संस्थेच्या यजमानपदाखाली आयोजित करण्याबाबत प्राथमिक चर्चा झाली असून लवकरच याबाबत सविस्तर माहिती कळविण्यात येईल. यावर्षीचे २१वे विदर्भ पक्षिमित्र संमेलन महाराष्ट्रातील पूर्वेकडील शेवटचा जिल्हा गडचिरोली येथे आयोजित करण्याचे ठरले आहे. याबाबतची माहितीसुद्धा आयोजकांकडून लवकरच प्रसिद्ध केली जाणार आहे.

महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे देण्यात येणाऱ्या चार पुरस्कारांपैकी तीन पुरस्कारांसाठी एकरक्कमी दान निधी यापूर्वीच प्राप्त झाला होता. पक्षी संवर्धन व सुश्रुषा, या चौथ्या पुरस्कारासाठी आपले आजीवन सभासद मा. श्री. अनिल बहादुरे (मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, अमरावती) यांनी संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात रु. ५०,०००/- देणगी जाहीर केली. श्री. अनिल बहादुरे यांचे मन:पूर्वक आभार.

या काळात संस्थेसाठी एका पाठोपाठ एक अशा दोन दु:खद बातम्या आल्यात म्हणजे ०१ मार्च रोजी महाराष्ट्र पक्षीमित्रचे आजीव सभासद, तरुण पक्षी अभ्यासक तथा पर्यावरणाच्या लढाईतील खंदा कार्यकर्ता धर्मराज पाटील यांचे अकस्मात दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने एक अभ्यासू पक्षिमित्रास आपण मुकलो आहोत. महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे धर्मराज पाटील व धवलभाई  कन्सारा यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

*****

# महानुभाव पंथ साहित्यातील काही पक्षी



**माणिक पुरी**
परभणी
(९८८१९६७३४६)

पक्षी तसे सगळ्यांना आवडतात. अंगणात उतरणाऱ्या चिमण्या असोत की, पाणथळ जागी उतरणारे राजहंस. त्यांना पाहण्यातली मजा काही औरच! पक्षी पाहणे आणि निरीक्षण करणे यात बराच फरक आहे. तासन् तास निरीक्षणातून केलेल्या नोंदी अचूक ठरतात.

पक्ष्यांविषयीच्या अनेक गोष्टी आपण ऐकत आलो आहोत. घराघरातून आजीनं सांगितलेल्या गोष्टीतून पक्षी डोकावत तर अनेक लोककथांतून पक्षी विहार करत. 'मृगपक्षीशास्त्र' सारख्या काव्यातून पक्ष्यांचा बारीक-सारीक तपशील वाचायला मिळतो. केवळ मनोरंजनासाठी पक्षी पाहण्याऐवजी 'पक्षिशास्त्र' समजून घेण्यासाठी पक्षिनिरीक्षणाची चळवळ जोर धरू लागली. त्यातून साहित्याची निर्मिती होऊ लागली. अनेक लेखकांच्या साहित्यातून पक्षिकुळांविषयीच्या अनेक नोंदी वाचायला मिळू लागल्या. त्या नोंदी पक्षिनिरीक्षकांना उपयुक्त ठरत. तर काही नोंदींची नव्यानं भर पडत असे. विशेषतः स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांविषयीच्या दुर्मीळ नोंदी वाचायला मिळू लागल्या. संस्कृत साहित्य, पाली साहित्य, लोकसाहित्य, महानुभाव पंथ साहित्य, संत साहित्य अशा अनेक साहित्य प्रकारातून पक्षिवैभव समजून घेता येतं. पक्षिशास्त्रज्ञ 'ॲरिस्टॉटल'ने स्थलांतरीत पक्ष्यांविषयीच्या काही नोंदी लिहून ठेवल्या आहेत. तशा काही नोंदी महानुभाव पंथ साहित्यातही सापडतात. विशेषतः 'चातक' या पक्ष्याविषयीची नोंद 'केसोबास' यांच्या 'दृष्टांतपाठ' या ग्रंथात वाचायला मिळते. तो 'चातकाचा दृष्टांत' आहे.

'चातकु असे : तो गावोगावीं देशोदेशीं नदोनदी बावीपोखरणी असति परि तेथचें उदक न स्विकरी । वरौती चांचु करुनि उदैलेया मेघाची वास पाहे । तो वरीषें ते तो स्वीकरीं।।'

या दृष्टांतात चातकाच्या स्थलांतराविषयीची गोष्ट लपलेली आहे. चातक पावसाचं पाणी पितो म्हणजे जिकडे पाऊस तिकडे तो जातो. त्याला कोणत्याही गावाची, नदीची, देशाची सीमा लागू पडत नाही. एखाद्या व्यक्तीला दुसऱ्या देशात जाण्यासाठी परवानगी घ्यावी लागते. तसं पक्ष्यांचं नसतं. हवामान बदलामुळे पक्ष्यांना स्थलांतरित व्हावं लागतं.

मी अनेक वेळा चातकाला पाहिलय. पावसाळ्याच्या सुरुवातीला ही पाखरं इंद्रायणी माळावर भेटत. बाभळीच्या फांद्याफांद्यातून डोकावत. त्यांना अळ्या टिपताना पाहिलंय. कधी-कधी ही पाखरं जमिनीवर उतरत. कीटकांचा वेध घेत. पुन्हा झाडांच्या फांदीवर जाऊन बसत. 'चातक फक्त पावसाचं पाणी पितो' ही कविमनाची कल्पना फक्त कवितेपुरतीच मर्यादित. चातक जमिनीवर उतरूनही पाणी पितो. झाडावरील पानांवरून ओघळणारं पाणी टिपतानासुद्धा पाहिलंय. चातक मेघाची तर शेतकरी चातकाची वाट पाहतो.

चातक आणि शेतकरी यांचं खूप जवळचं नातं आहे. चातकापाठोपाठ पाऊसही येतो हे शेतकऱ्याला माहीत असतं. शेतीची मशागत लगबगीने करू लागतो. जसं पावशाच्या आवाजानं त्याच्या चेहऱ्यावर हिरवळ दाटते तसं चातकाला पाहूनही तो आनंदित होतो. महानुभाव पंथ साहित्यातील चातक पक्ष्याच्या नोंदी आजही उपयुक्त ठरतात. केसोबासांचे पक्षिनिरीक्षण उत्तमच होते हे कळू लागते.

चातकासारखे 'राजहंस' पक्षीही स्थलांतर करतात. केसोबासांनी त्याविषयीचा दृष्टांत लिहिलेला आहे.

'राजहंस असे : तो मानस सरोवरावांचौनि न रमे : गावोगावीं देशोदेशीं नदोनदी बावीपोखरणी असति परि तेथ न रमे : कां तें आदिवंतें उदकें म्हणौनि ।।'

या दृष्टांतावरून राजहंस पक्ष्यांचे आवडते ठिकाण म्हणजे मानस सरोवर होय. या पाणपक्ष्याला पाहण्यासाठी लोक तिथे जात. केसोबासांनी त्यांच्या स्थलांतराविषयी लिहून ठेवलंय. पण त्यांच्या रंगाविषयीची माहिती उपलब्ध नाही.

दामोदर पंडित कृत 'वछाहरण' या ग्रंथातही राजहंस पक्ष्यांविषयीची वेगळी नोंद वाचायला मिळते.

'प्रकृतीपुरखविवेकातें । जैसे परमहंस जाणते
तैसे क्षिरानिरा निवाडू करिते । ते निर्मळ राजहंस ।।'

लेखकाने राजहंसाला निर्मळ म्हटलंय. ते पक्षी क्षीर आणि नीर वेगळं करू शकतो असंही लिहिलं आहे. संस्कृत साहित्यात 'हंसाचा नीरक्षीरविवेक' यांविषयी वाचायला मिळतं. पक्षितज्ज्ञ 'मारुती चितमपल्ली' यांच्या 'आनंददायी बगळे' या पुस्तकातही आणखी नव्याने नोंद सापडते.

कमळाच्या देठातून दुधासारखा गोड रस निघतो. तो रस राजहंस पक्ष्याला खूप आवडतो. कमळ पाण्यात उमलतात. सभोवार असलेल्या पाण्यातून नेमकेपणाने राजहंस कमळातील पांढरे तंतू खातात. यालाच दामोदर पंडितांनी 'क्षिरानिरा निवाडू करिते' असे म्हटले आहे.

पण अनेक लोक राजहंसला दूध आणि पाणी वेगळे करणारा पक्षी म्हणून ओळखतात. 'पुराणातील वांगी पुराणात' ही म्हण जशी प्रचलित आहे, तसंच राजहंसासंदर्भात घडलेलं आहे. 'पुराणातील वानगी पुराणात' इथपर्यंत कुणी पोहोचतच नाही.

हिवाळ्यात या पाणपाखरांना येलदरी, जायकवाडी, भिगवण या परिसरातही पाहता येतं. जवळून त्यांचं निरीक्षण करता येतं. त्यासाठी भटकंती करायची तयारी असावी लागते. चार भिंतीत बसून पक्षी निरीक्षण करता येत नाही हेच खरं!

महानुभाव पंथ साहित्यातील महत्त्वाच्या लेखिका 'धानाइसा खामनीकर' यांनी 'सह्याद्रिवर्णन' या ग्रंथाची निर्मिती केली आहे. त्यांनी चक्रवाक, राजहंस पक्ष्यांच्या स्थलांतरासंबंधी नोंद केलीय. त्याकाळी मराठवाड्यात अनेक ठिकाणी राजहंस पक्ष्यांचे वास्तव्य होते हे लिहून ठेवलंय.

'जेथ सरोवरीं बहूवस : चक्रवाक राजहंस
त्यांचे कळरव सुरस : काइ सांगो ।।'

(तेथे पुष्कळ सरोवरे आहेत आणि त्या सरोवरामध्ये चक्रवाक, राजहंस यासारखे मधुर आवाज करणारे, किलबिल करणारे पक्षी आहेत, त्या सर्वांचे वर्णन किती म्हणून सांगावे.)

धानाइसा खामनीकर यांनी सह्याद्री पर्वतावरील विविध पक्ष्यांची तपशीलवार माहिती ग्रंथात नमूद केली आहे. त्या पर्वतावरील वृक्ष कल्पतरूशी चढाओढ करीत आकाशापर्यंत जाऊन पोहोचले आहेत. त्या वृक्षांची सावली अवघ्या पक्ष्यांना मिळाली आहे.

मराठी साहित्यातील आद्य कवयित्री 'महदंबा' यांनी रचलेल्या धवळ्याच्या पूर्वार्धात हंसाची चालण्याची गती आणि बाळाचं दुडूदुडू चालणं सारख्याच गतीचं आहे अशी वेगळी नोंद केली आहे.

जसं सह्याद्रि वर्णनात चक्रवाकविषयी नोंद सापडते तशी नोंद 'वछाहरण' या ग्रंथातही सापडते. त्या पक्ष्यांभोवती वलय पहायला मिळतं. जोडीनं विहार करणारे चक्रवाक लक्ष वेधून घेतात. परभणीजवळील 'आळंद' तलावात या पक्ष्यांना पाहिलंय. तळ्यालगत गळून पडलेली त्यांची पिसं आठवण म्हणून जपून ठेवलीत. दिवसभरातील नोंदी नोंदवहीत घेतल्या. दामोदर पंडितांनी केलेल्या नोंदीची प्रचिती वारंवार येते.

'एकांगुष्टतपिए बक । नासाग्रिं दृष्टि घालितााति ढोंक
ऐज़दिक्षीत तैसे चक्रवाक । प्रियाते सांडिती नां ।।'

चक्रवाक, सारस या पक्षांच्या जोड्या जुळल्या की, आयुष्यभर एकमेकांच्या विश्वासानं वावरतात. त्यांना विरह सहन होत नाही. दोघेही सोबतच विहार करताना दिसतात.

'अज्ञातलीळा' या ग्रंथात 'चक्रवाकानुवादे गुरुशिष्या अज्ञान कथन' या लीळेत चक्रवाकविषयी नोंद सापडते. हे पक्षी दिवसभर जोडीनं दिसतात तर रात्री त्यांचा वियोग होतो ही एक वेगळी नोंद वाचायला मिळाली.

चक्रवाक पक्ष्यांविषयीच्या रात्रीच्या नोंदी इतरत्र कुठेही वाचायला मिळाल्या नाही. स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांविषयी माहिती संकलित करणं खूपच जिकिरीचं काम असतं. पक्षिशास्त्रज्ञ 'लेस्ली ब्राउन' लिहितो की, 'फ्लेमिंगो पक्षी अंडी कुठे घालतात यासाठी मला दहा वर्ष खर्च करावी लागली. मी आजवर अभ्यासलेल्या कोणाही प्राण्यानं किंवा पक्ष्यानं फ्लेमिंगो इतकं कष्ट आणि दुःख मला दिलेलं नाही.'

'लीळाचरित्र' मराठी साहित्यातील आद्य चरित्रग्रंथ मानला जातो. 'पंडित म्हाइभट' या लेखकाने त्या लीळांचे संकलन केले आहे. या ग्रंथात कावळा आणि साळुंकीची नोंद सापडते. श्री चक्रधर स्वामींनी सारंग पंडिताच्या मुलीला म्हणजे धानाईसाला कावळ्याची आणि साळेची कथा रंगवून सांगितल्याची लीळा 'लीळाचरित्र : पूर्वार्ध' मध्ये सापडते.

सर्वज्ञे म्हणीतलें :
काउळेयाचें घर सेणाचें : साळैचें घर मेणाचें :
पाउसू पडे : काउळेयाचे घर वाहात जाए:
साळैचे घर उरे :
साळै आपुलेया घराआंतु रीगौनि म्हणे :

काउळेया काउळेया : कानु कीं डोळा :

ऐसें तीनि वेळां उचारिलें : मग तो थाया वीसरलीं :

या लीळेत कावळ्याचं घर वाहून गेल्याचं कळतं. याचा अर्थ कावळ्याचं घरटं ओबडधोबडच असलं पाहिजे. पाऊस पडताना कावळे घरट्यात बसूनही भिजतात. पडत्या पावसात त्यांना घरट्याचा काहीच उपयोग होत नाही हे आजही पाहायला मिळतं. याउलट साळुंकीचं घरटं आडोशाला असतं. त्यामुळे ती भिजत नाही. म्हणूनच तिचं घर मेणाचं आहे असं लेखकाला सुचवायचं आहे.अनेक साळुंकीची घरटी गावात पाहायला मिळतात. याउलट कावळ्यांची घरटी गावालगतच्या झाडावर आढळून येतात. कोंबडी, चिमणी, साळुंकी या पक्ष्यांना गावात राहायला आवडतं. ते पक्षी माणसांच्या सहवासात वाढतात. शिक्रा, ससाणा, घार, गरुड अशा शिकारी पक्ष्यांपासून स्वतःला आणि पिलांना सुरक्षित ठेवता येतं ही त्यामागील भूमिकाही असते. 'दृष्टांतपाठ' या ग्रंथात कोंबडीविषयीचा दृष्टांत वाचायला मिळतो. तो 'कुकडीयचा दृष्टांत' म्हणून ओळखला जातो.

'कुकडी असे : ते आंडीं घाली : पीलीं होति : तेयांसि पाखवा दे : अमृतकळा असे ते संचरे: त्यातलं तीयें वाढति।।'

'अज्ञातलीळा' या ग्रंथात 'वसीष्ट लवणाख्यान कथन' या लीळेत मोराविषयीची नोंद सापडते. (स्वप्नात एक पारधी आला. त्याच्यापुढे मोर अवतरला. तो मोराचा पाठलाग करू लागला. त्या मोराला त्याच्या भाऊबंदकीपासून दूर नेले. घोड्यावरून त्या मोराचा पाठलाग केला. मोर एकीकडे निघून गेला. तेव्हा घोडा परतीच्या प्रवासाला निघाला. तेव्हा घोडा वेगाने पळू लागला. त्याने झाडाची फांदी धरली. घोडा निघून गेला. रात्र झाली.घुबड घुत्कार करू लागले.)

'सह्याद्रिवर्णन' या ग्रंथातही मोर आणि इतर काही पक्ष्यांच्या आवाजासंदर्भात माहिती मिळते.

'मयुरांचीया केका : षट्पदांचे झंकारु आइका

पंचमाळापु सुकसारिका : कोकिळांचे'

म्हणजेच मोरांचे केकावणे, भ्रमरांचा झंकार, राघू, मैना आणि कोकिळेचे गाणे हे एकाच सुरातील आहे. अनेक पक्ष्यांच्या आवाजात अनेक सूर सापडतात हेसुद्धा खरंय. मोराच्या कंठातून षड्ज (सा), चातकाच्या कंठातून ऋषभ (रे), क्रचाच्या कंठातून मध्यम (म) आणि कोकिळच्या कंठातून पंचम (प) ऐकू येतो.

महानुभाव कवी गोपाळदास कृत 'चंद्रावळी आख्यानकाव्य' या ग्रंथात 'कोकिळा-स्वर आळविती ध्वनीं, शूक सारिका कूंजती वणी अशी नोंद सापडते.

'वछाहरण' या ग्रंथात दामोदर पंडित यांनी मोराविषयी लिहून ठेवलंय.

'हांतिरुएं सिहेंसिं खेलत। मृग व्याघ्रासिं करुवाला करित

मोराचा पाखवां विसंवत। फणिक देखां।।'

लीळाचरित्र, दृष्टांतपाठ, महदंबेचे धवळे, सह्याद्रिवर्णन, वछाहरण, अज्ञातलीळा, चंद्रावळी आख्यानकाव्य या ग्रंथांतून पक्षिकुळांविषयाची तपशीलवार निरीक्षणे वाचायला मिळतात. ही निरीक्षणे वगळून पक्षिशास्त्राकडे जाता येत नाही. लेखकांची निसर्गाविषयीची ओढ यातून जाणवते. ती ओढ आपणालाही खुणावते.

*****



**३४ व्या पक्षिमित्र संमेलन दरम्यान सिध्देश्वर वनविहार येथे पक्षि निरीक्षणासाठी जमलेले संमेलनातील सहभागी**

# एका दगडावर तीन पक्षी...



ऐश्वर्या भोसले
सातारा
७८७५५५९९७५

'एका दगडात तीन पक्षी' अशी म्हण ऐकली असेलच... पण मला सापडले एका दगडावर तीन पक्षी ... साताऱ्यावरून कडेगावला जायला बोंबालवाडी गावातून एक रस्ता जातो... त्याच्या कमानीतून आत गेल्यावर उजव्या बाजूला एक माळरान आणि त्या पलीकडे एक तलाव... कडेगाव सांगलीला झालेली बँकेची बदली पथ्यावर पडली... फोटोग्राफीची आवड होतीच... त्यात एवढ्या निसर्ग सुंदर परिसरातून जाण्याचा योग आला... बँकेचं टाईमिंग आणि बस गाड्या यांचं गणित जुळणार नसल्यामुळे गाडी आणि अर्थात कॅमेरा (DSLR) जो हौसेने त्या आधीच्या वर्षी घेतला होता पण एवढा वापरात नव्हता) सोबत घेऊन... रोजचा प्रवास सुरू झाला... नवनवीन ठिकाण हेरून... थोडं लवकर निघून फोटोग्राफी सुरू झाली... आणि खरंच लक्षात आलं जीवन खूप सुंदर आहे... निसर्गाच्या सानिध्यात... आणि सोबत कॅमेरा... बस... हा तर त्या तलावाने लगेच लक्ष वेधून घेतलं... मग नंतर बऱ्याच वेळा मी तिथे फोटो काढायला थांबले... मागच्या महिन्यात बऱ्याच दिवसांनी मी कडेगावला निघाले कामानिमित्त थोडं लवकर निघून तलावाच्या कडेला गाडी पार्क केली... पाणकावळे, नदी सुरय, बगळे, धोबी, टिटवी... असे बरेच पक्षी मिळाले... निघताना एका वेगळ्या चिमणीने लक्ष वेधून घेतले... मागच्या वेळेस फोटो काढता आला नव्हता तिचा. ती एका लहान दगडावर बसली होती. तिच्या मागावर मी थोडं पुढे गेले... ती परत उडून पुढे जाऊन एका मोठ्या खडकावर बसली... मी हळूच तिकडे जायला लागले... कारण मागचा अनुभव असा होता की ती लगेच उडून जात होती... पण या वेळेस मागची ओळख असल्यासारखी जणू ती मला घेऊन गेली त्या खडकापर्यंत... आणि माझ्या आनंदाला उधाण राहिलं नाही... तीन वेगळे पक्षी दिसले... फटाफट फोटो काढले... उडून जातील या भीतीमुळे पण या वेळेस पक्ष्यांनी ठरवलं होतं की, कंटाळा येई तोपर्यंत फोटो काढून द्यायचे... आणि तसंच झालं... फोटो काढून मी तिथून निघाले तरी सगळी मंडळी मला बाय करत त्याच दगडावर. कोवळं ऊन खात बसली होती...

आता डोक्यात पुढचे विचार पक्ष्यांची नाव शोधणे आणि ती अशी होती...

१) तुरेवाला चंडोल (Crested lark)
२) मुरारी (Ashy crowned sparrow lark)
३) डोंबारी (Rufous tailed lark)

**१) तुरेवाला चंडोल :–** ८ सेंटीमीटर आकाराचा पक्षी आहे. नर-मादी दिसायला सारखेच असतात, त्यांच्या पाठीकडून गडद बदामी-मातकट रंग त्यावर तुटक रेषा, पोटाकडून पांढरा रंग आणि पिवळसर रंगाचे पाय. इतर चंडोल प्रमाणेच नर तुरेबाज चंडोल उंच भरारी मारण्यासाठी आणि उडताना गोड गाणी म्हणण्यासाठी प्रसिद्ध आहे. वीण काळात अनेक नर उंच उंच उडून स्पर्धा करतात.खुले मैदानी प्रदेश, अर्ध वाळवंटी प्रदेश, कमी गवताळ भाग अशा प्रकारच्या प्रदेशात राजस्थान ते मध्य प्रदेश महाराष्ट्रसह दक्षिण भारत तसेच पश्चिम बंगाल, ओडिशा या भागात सर्वत्र राहणारा पक्षी. तसेच चीन आणि आफ्रिकेतील काही भागात वास्तव्य आहे. गवताळ भागात, दगड-कपारीत असलेले विविध कीटक हे यांचे खाद्य आहे.

मार्च ते जून हा काळ तुरेबाज चंडोलचा प्रजनन काळ असून गवतातच साधे घरटे बांधले जाते. मादी एकावेळी ३ ते ४ फिकट पिवळी-पांढरी त्यावर जांभळी किंवा तपकिरी ठिपके असलेली अंडी देऊन एकटीच अंडी उबविते. मात्र पिलांना खाऊ घालण्याच्या कामात नर मादीला मदत करतो.मुरारी व चिमणा चंडोल हे दोन्ही एकाच कुळातले पक्षी असून, त्यांच्या अनेक सवयींमध्ये साम्य आढळते. माळराने, शेती, नांगरलेली जमीन या प्रदेशांत आढळणारा मुरारी हा पक्षी चिमण्या चंडोलप्रमाणेच गवताच्या बिया, इतर धान्य व कीटक यांच्यावर गुजराण करतो. फेब्रुवारी ते मे या काळात मुरारीची मादी तीन-चार अंडी घालते.

**डोंबारी चंडोल :–** लांबी : १३ सेंमी. आकार : चिमणीपेक्षा छोटा. वरील बाजूस मातकट-तपकिरी, बसका चंडोल. चोच जाड, तुरा

नाही. मुकुट राखाडी. डोळ्यामधून जाणारी काळी पट्टी. चोचीपासून बुडापर्यंत खालील बाजू काळी. दिसायला एकंदरीत नर चिमण्यासारखा तर मादी चिमणी सारखी. आवाज: विणीच्या हंगामात सुंदर हवाई कसरती करीत बासरीसारखे शेवटी लांब 'व्हीची' ने संपणारे स्वर आळवतो. सुरुवातीला तीसेक मीटर उंची गाठून पंख बंद करून खाली झेपावतो, मध्येच पंख पसरवून फडफडत आणखी थोडी उंची गाठतो. पुन्हा झेप, पुन्हा उंची असे दोनतीनदा झाल्यावर एखाद्या उंचवट्यावर वा खडकावर विसावतो. व्याप्ती : रहिवासी. सह्याद्री सोडून संपूर्ण महाराष्ट्र. अधिवास: पडीक शेतजमिनी, खुले झुडूपी प्रदेश, निम्न-वाळवंटी प्रदेश, खुली खडकाळ माळराने.

**रानटी वनस्पती तसेच गवताच्या बिया, कीटक**

मुरारी व चिमणा चंडोल हे दोन्ही एकाच कुळातले पक्षी असून, त्यांच्या अनेक सवयींमध्ये साम्य आढळते. माळराने, शेती, नांगरलेली जमीन या प्रदेशात आढळणारा मुरारी हा पक्षी चिमण्या चंडोलप्रमाणेच गवताच्या बिया, इतर धान्य व कीटक यांच्यावर गुजराण करतो. फेब्रुवारी ते मे या काळात मुरारीची मादी तीन-चार अंडी घालते.



**तुरेवाला चंडोल** (Crested lark)



**मुरारी** (Ashy crowned sparrow lark)



**डोंबारी** (Rufous tailed lark)

# मित्रपक्षी

निसर्गातले स्वच्छंद विहार करणारे जीव,
त्यांना आपण पक्षी म्हणतो,
निर्मात्याने पक्ष्यांना विविध रंग आणि
आवाज बहाल केले आहेत!

त्यांच्या या वैशिष्ट्यांमुळे,
पक्षी आपले लक्ष वेधून घेतात,
जसे की चिमणीची चिवचिव,
कावळ्यांची काव काव!

मोराचा फुललेला पिसारा, पोपटाचं बोलणं,
कोकिळेचा गायन स्वर,दयाळची लकेर,
बुलबुलची शीळ, शिंजीरचा मंजूळ स्वर,
साळुंक्या, सातभाईंची किलबिल!

असे अनेक पक्षी,
आपण आठवणीत जपलेले आहेत,
निसर्गाच्या सान्निध्यातील,
हे पक्षीवैभव आपल्याला लुभावतं!

त्यांचं निरीक्षण करता करता,
त्यांच्या प्रेमात ओढले जातो,
पक्षिमित्र होऊन पक्षीनिरीक्षणाचा आनंद घेतो,
मित्रपक्ष्यांच्या सहवासात,
आरोग्यदायी छंद जोपासता येतो!

**- बाळासाहेब कुलकर्णी,**
मो.९८२२४६५४१०

# माझी सोलापूर सफर



**भारती धोंडे पाटील**
९६१९९७१४९५

सोलापूर सफर ही माझ्यासाठी आयुष्यातील एक नवा टप्पा ठरली. माझे जुने स्नेही श्री. विकास कोलते यांच्या सोबत नेहमी पर्यावरण, पक्षी जगत, पक्षी निरीक्षण या विषयावर चर्चा होत असे. या पक्षी जगताचा अनुभव मी घ्यावा हा त्यांचा आग्रह असे. या नवीन जगाशी घट्ट मैत्री करावी याकरिता ते मला उद्युक्त करत असत परंतु मी निसर्गप्रेमी असूनही या ना त्या कारणाने येऊ शकत नसे. माझा जास्त ओढा हा इतिहास, गडकिल्ले भटकंती, गडकिल्ले संवर्धन याकडे नेहमी असे. या वेळी मात्र त्यांच्या आग्रहाला मान देऊन WINS टीम सोबत मी महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन सोलापूर साठी सोलापूरला आले.श्री. विकास कोलते, श्री. संजोग करंडे, प्रिया कराडकर, मेघा सुर्वेयांचे सोबत मी (भारती धोंडे पाटील) ५ जानेवारी २०२२ रोजी मुंबईहून निघालो. गंध एक्सप्रेसने आम्ही पहाटे ४.३० वाजता सोलापूर शहरात पोहोचलो. मनात खूप साऱ्या प्रश्नांचं मोहोळ घेऊन निघाले होते. ठरल्याप्रमाणे आम्ही आमचं सामान गाडीत ठेवलं आणि हॉटेलकडे न जाता आमचा प्रवास सुरू झाला; पण सुरू होतानाच पहिला ब्रेक लागला तो आमचा गाईड न आल्यामुळे. गाईडची वाट पाहता पाहता दिवस उजाडायची वेळ आली, 'गोल्डनलाईट' निघून जाऊ लागली. पहिलाच अनुभव मला पक्षी पाहणं जमेल का? दिसतील का? कसं जमायचं हे प्रश्न अगोदरच डोक्यात भिनभिनत होते. त्यात आता अनुभवी पक्षी निरीक्षकांकडून ऐकू येऊ लागले, 'गोल्डनलाईट' गेली तर पक्षी उडून जातील, मग काय दिसणार? ७:३० च्या दरम्यान आम्ही गंगेवाडी माळरानावर पोहोचलो आणि तोवर चांगलं उजाडलं होतं. त्यामुळे मोजक्या १८ प्रजाती पहायला मिळाल्या. (अर्थात हे पक्षी व त्यांची नावं मला सोबत विकास आणि संजोग असल्याने समजली) सापमार गरूड, पॅलीड हॅरियर, वेडा राघू, ब्ल्यू चिक इटर, रूफर्स टेल लार्क, वायर टेल स्वॅलो, सायबेरियन स्टोन चॅट, पिपीट इ. आजवर काही मोजक्या प्रजाती माहिती असणाऱ्या माझ्यासाठी सगळं फारच उत्साहवर्धक होतं. पक्षी, वेगवेगळी नावं, ओळखण्याची पद्धत सगळंच. पण पक्षी निरीक्षणाचा पहिला नियम समजला तो म्हणजे दिवस उजाडण्यापूर्वीच्या झुंजूमुंजू पहाटवेळी तुम्हाला पोहचायचे आहे, तुम्ही उशीर केलात तर पक्षी दिसण्याची संख्या कमी होणार.

उन्हं चढू लागली आणि मग ठरलं की दुसऱ्या ठिकाणी जायचं आहे, आणि हिरज कॅनलला पोहोचलो. तोवर भर दुपार झाली होती. अशा भर उन्हात पक्षी उडताना कमी पण गारव्याला कपारीत बसलेले पहायला मिळतात. हिरज कॅनलच्या कपारीत आम्हाला स्पॉटेड आऊलेट आणि इंडियन इगल आऊल पहायला मिळाले. या व्यतिरिक्त काहीच पहायला मिळाले नाही, त्यामुळे भ्रमनिरास झाला. तिथून परतीच्या प्रवासाला लागलो तेव्हा एक खाटीक पक्षी शिकार करून ती शिकार खातानाचे दृश्य पहायला मिळाले. पक्ष्यांच्या मुख्य सवयींपैकी स्वतःचे खाद्य गोळा करणे आणि त्यावर ताव मारणे ही सवय अभ्यासायला मिळाली. दिवसाच्या शेवटाकडे नान्नज पक्षी अभयारण्याला भेट दिली. परंतु तिथे काही विशेष पहायला मिळालेच नाही. नान्नज पक्षी अभयारण्य येथे ३५ वर्षेवनसंरक्षक म्हणून काम पाहणाऱ्या भागवत मस्के यांच्याशी संवाद साधला. त्यांच्यासोबत झालेल्या संवादातून माळढोक पक्ष्याचे वर्तन, सवयी, भागवत काकांचे विविध अनुभव ऐकायला मिळाले. सूर्य मावळतीला जात असताना नान्नज परिसरातील ड्रीमलँड पठारावर आलो, तिथे पुन्हा थोड्या वेगळ्या प्रजाती पहायला मिळाल्या, व्हाईट आय बझर्ड, मॉंटेग्यूज हॅरियर, सातभाई इ. एक दिवस संपला. परंतु मोजक्या प्रजाती सोडता विशेष काही पहायला मिळाले नाही, त्यामुळे मन खट्टू झाले. सोलापूर म्हणजे ३००+ पक्षी प्रजातींचे माहेरघर आहे (निघण्यापूर्वी केलेला थोडासा अभ्यास) आणि एक संपूर्ण दिवस फक्त पक्षी पाहण्यासाठी फिरतोय तरीही मोजक्या प्रजाती पहायला मिळाव्या, तेही सोलापुरातील जाणकार पक्षिमित्र सोबत असताना! या गोष्टीचं नवल वाटत होतं त्याहीपेक्षा जास्त वाईट वाटलं. कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न करत होते; पण मग विचार केला, ठीक आहे! अजून तीन दिवस आहेत हातात, पाहूया काय अनुभव मिळतोय ते...शुक्रवार दिनांक ७ जानेवारी २०२२ दिवस दुसरा, अगदी लवकर एकरूख

गाव हिप्परगा तलाव या ठिकाणी पोहोचलो, गाडी तलावाजवळ पोहोचणार इतक्यात आमच्या गाडीसमोर दोन मोरांनी दर्शन दिले. राष्ट्रीय पक्ष्यांचं दर्शन घेऊन आम्ही हिप्परगा तलावावर पोहोचलो. कॉमन कूट, इग्रेट, पावश्या, शिकरा यांचं दर्शन झालं आणि थोड्या वेळात तिथे बार हेडेड गूज (पट्टकदंब) या स्थलांतरित पक्ष्यांचा थवा तलावावर उतरला. त्यांच्या उडण्यातील विविधता, डस्ट बाथ, मड बाथ, सनबाथ अशा वेगवेगळ्या सवयींचं निरीक्षण करायला मिळालं. पुढे थोड्या अंतरावर फ्लेमिंगो चा थवा पहायला मिळाला. दिवस सार्थकी लागला. या व्यतिरिक्त इतरही काही प्रजाती पहायला मिळाल्या. संध्याकाळी बोरामणी ते गंगेवाडी असं पक्षी निरीक्षण सत्र केलं या दरम्यान प्रिनिया, सँडग्रूव्हज, कुकल इ प्रजाती पहायला मिळाल्या. खरं आकर्षण होत चार पायांच्या प्राण्यांचं (कोल्हा, लांडगा, हरिण) पैकी फक्त हरिणांचा कळप पहायला मिळाला या ठिकाणी मी सोलापुरात पहायला मिळालेल्या गवताळ माळरानांविषयी लिहल्याखेरीज पुढे जाणं पटतच नाही. सोलापूर मधील विस्तीर्ण पसरलेली माळरानं पाहून अगदीच भान हरपून गेलं. लांबच लांब पसरलेली गवताळ माळरान त्यावर पिवळसर सुकलेलं कमी उंचीचं गवत आणि त्यात पहायला मिळणारी समृद्ध जैवविविधता यांच्या प्रेमात पडावं असंच सारं. सोलापुरातील वनक्षेत्र हे उत्तर १.८ टक्के असून येथे ३५७ प्रजातींचे पक्षी आढळतात. यामुळेच सोलापूर हे पक्ष्यांचे माहेरघर आहे. नान्नज पक्षी अभयारण्य हा दूरवर क्षितिजापर्यंत माळरानाने व्यापलेला भूभाग पाहून तर आपण महाराष्ट्रात आहोत यावर विश्वास बसत नव्हता. हिप्परगा तलाव आणि तेथील पाणपक्ष्यांच्या विविध प्रजाती, स्थलांतरित पाहूणे पक्षी यांनी हा परिसर समृद्ध आहे. आणि पक्षी प्रेमींसाठी खरोखरच अभ्यासासाठी खूप सारं मटेरियल उपलब्ध आहे इथं. सोलापूर ची ही सफर करून आम्ही तयार झालो ते ३४ व्या पक्षिमित्र संमेलनासाठी, दिनांक ८ जानेवारी संमेलनाला सुरुवात झाली. उद्घाटन, स्वागत समारंभ, पुरस्कार वितरण हे झाल्यानंतर मात्र भरगच्च व्याख्यानांचे आयोजन होते. हा अनुभव माझ्यासाठी फारच नवीन होता. प्रथमच अशा पद्धतीने अभ्यासपूर्ण, निरीक्षण संपन्न पक्षी जगत शब्दांकनातून ऐकणं त्यामुळे मन लावून ऐकत होते. काही विषय खरोखरच खूप सुंदर पद्धतीने मांडले गेले. परंतु काही उगाचच फापटपसारा वाटले. उल्लेखनीय वाटावे असे विषय म्हणजे राजू कसंबे सरांचा पक्षी स्थलांतर, सुनील लिमये सरांचा पक्षी संवर्धन हे विषय मला विशेष आवडलेले काही, राजशेखर हिप्परगी सरांचा माळढोकच्या वर्तणुकीचे पर्यावरणशास्त्रीय निरीक्षण हा विषय हा सर्वात जास्त आवडलेला विषय, सरांनी हा विषय फारच सविस्तर पद्धतीने मांडला होता, विषयाचा अभ्यास व मांडणी खूपच अभ्यासपूर्ण परंतू त्यांना दिलेला वेळ फारच तोकडा पडला असं मला वैयक्तिक वाटल. थोडा राखीव वेळ जर सरांना दिला गेला असता तर त्यांच्या सविस्तर अभ्यासातून ज्ञानात भर नक्कीच पडली असती.

दुसऱ्या दिवसाची सुरुवात पक्षी निरीक्षणाने झाली आणि या दिवशी पुन्हा बरीच व्याख्याने असल्याने भरगच्च असा दिवस होता. या दिवशी देखील काही विशेष नोंद करता येण्याजोगी व्याख्याने होती. पक्ष्यांच्या आवाजावरून त्यांची वर्तन वैशिष्ट्ये ओळखणे, घुबड संवर्धन, पक्षिमित्र अंक ओळख, पारव्यांची वाढती संख्या, अंटार्क्टिका खंडावरील पक्षी, पक्षी प्रसारित आजार व उपचार पध्दती हे काही उल्लेखनीय विषय.एकंदर पाहता महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन हा एक यशस्वी उपक्रम होता. यात वाद नाही परंतु काही कमी जास्त होत असतं. मला वैयक्तिक काही सुधारणा सुचवाव्या असे वाटते म्हणून मी नमूद करते आणि शिवाय पुढील नियोजन करण्यात मी माझे संपूर्ण सहाय्य करण्याचे आश्वासन ही देते आहे. कारण प्रसंगी यात जर आपण सुधारणा करू शकलो तर आपल्या कार्यक्रमाची शोभा दहा पटीने अधिक आकर्षक होईल यात तीळमात्र शंका नाही.

१) पक्षिमित्र संमेलन हा संघटनेचा मित्रमेळा आहे, सारे पक्ष्यांसाठी जमा होत आहेत तर स्थानिक ठिकाणी पक्षी निरीक्षण (bird trail) जास्तीत जास्त व्हावे.त्या निमित्याने त्या त्या भागातील पक्षी अधिवास माहिती होतील.

२) दर वर्षी आपल्या पक्षीमित्र संघटनेची सदस्यसंख्या वाढावी, नवीन पिढीला या क्षेत्राकडे आणण्यासाठी प्रयत्न व्हावेत

३) नवीन पक्षिमित्र सोबत घेऊन संमेलनात उपस्थित व्हावे याकरिता आजीवन सदस्यांना उद्युक्त करावे, सदस्यता फॉर्मवर एक रकाना वाढवला जावा, 'तुम्हाला इथे येण्यासाठी आमंत्रित कोणी केले' अशा प्रकारे जास्तीत जास्त सदस्यांना संघटनेशी जोडणाराचा नामोल्लेख केला जावा यामुळे इतर ही अनेक जण motivate

inspire होतील.

४) चळवळीतील मनुष्यबळ उपयुक्तता आणि सफलता वाढण्यास मदत होईल.


५)आयोजन करीत असताना व्याख्यानासाठी आलेले विषय पडताळून पहावे व त्याप्रमाणे विषयाच्या महत्त्वपूर्णते प्रमाणे विषय मांडणी साठी वेळ दिला जावा

६) व्याख्याने निवडीचे निकष ठरवून सर्वाधिकार संघटनेकडे असावे

७) विषयांच्या संख्येपेक्षा गुणवत्तेला जास्त महत्व दिले जावे, मग ते निवासस्थान, विषय निवड, पक्षी निरीक्षण यापैकी काही ही असो.

या लेखात मांडलेली मते ही माझी वैयक्तिक मते आहेच परंतु ही मांडण्यामागे उद्देश कोणाची ही चूक काढणे हा नाही तर आपण ज्या संघटनेचे सदस्य आहोत, तिचा दर्जा अव्वल व्हावा या भावनेतून व्यक्त केली आहेत. संघटनेच्या कार्याचा आलेख उंचावत जावा, पक्षी संवर्धन व पर्यायाने निसर्ग संवर्धन कार्यात भरीव कामगिरी व्हावी हा प्रांजळ उद्देश ठेवून ही मते व्यक्त केली आहेत आणि या कार्यात माझे संपूर्ण सहकार्य देण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

*****



मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
अन्न, नागरी पुरवठा व
ग्राहक संरक्षण विभाग
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in
दिनांक : 28 FEB 2022

शुभेच्छा

महाराष्ट्रात ४० वर्षापूर्वी 'महाराष्ट्र पक्षिमित्र नावाने चळवळ सुरु झाली व त्या चळवळीच्या चार दशके केलेल्या कार्यांचा व संमेलनाचा आढावा या 'महाराष्ट्र पक्षिमित्र ४ दशकपूर्ती' विशेषांकात घेण्यात आला आहे. विशेषांक अतिशय सुंदर व अभ्यासपूर्ण झाला आहे. त्याबद्दल आपल्या सर्व कार्यकारिणी सदस्यांचे अभिनंदन !

आपल्या चळवळीद्वारे पक्षी अभ्यासक व पक्षी संरक्षकांचे एक मजबुत जाळे निर्माण झाले असून याद्वारे पक्षी संवर्धन, अधिवास संवर्धन व जनजागृतीचे श्रेय आपल्या संघटनेला जाते. पक्षी संवर्धनासाठी आपण खूप चांगले कार्यकरीत आहात यासाठी सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा...!

**श्री अनिल माळी आपणही गेली २४ वर्षे पक्षी संवर्धनाचे कार्य वेगवेगळ्या माध्यमातून सातत्याने करीत आहात आपलेही अभिनंदन व मनःपूर्वक शुभेच्छा !**

(छगन भुजबळ)

प्रति,
अनिल माळी,
महाराष्ट्र पक्षिमित्र,
नाशिक सहसंघटक,नाशिक,

दालन क्र. २०२, मंत्रालय, मुख्य इमारत, मुंबई ४०० ०३२, दूरध्वनी क्र. २२०२ ५३०८, २२०२ ४५९२



**महाराष्ट्र पक्षिमित्रचा चार दशकपुर्ती विशेषांक,**
**राज्याचे अन्न नागरी पुरवठा मंत्री मा. श्री.छगन भुजबळ यांना संघटनेचे पदाधिकारी**
**श्री. अनिल माळी यांनी भेट दिला मा. मंत्री महोदय यांनी संस्थेच्या कार्याचे कौतूक केले**

# निसर्गातील सहसंबंध



**डॉ. संदिप साखरे**
अकोला
9922225341

जमिनीवरच काय पण समुद्रातसुद्धा साप आणि पक्षी यांचा 'टॉम अँड जेरी'चा खेळ चालतो, White-bellied sea eagle समुद्र गरुड भारतीय किनाऱ्यावर अधिराज्य गाजवणारा गरुड, महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर मुंबईपासून गोव्यापर्यंत याचा अढळ होत असतो, समुद्राच्या खऱ्या पाण्यात सापाच्या काही जाती विकसित झाल्या आहेत. त्या प्रामुख्याने किनाऱ्यालगत उथळ पाण्यात सापडतात, श्वास घेण्यासाठी त्याला थोड्या थोड्या वेळाला समुद्राच्या पृष्ठभागावर यावे लागते तर कधी सकाळचे कोवळे ऊन शेकण्यासाठी किनाऱ्यावर यावे लागते आणि अशा वेळी आकाशात घिरट्या घालणारा समुद्र गरुड संधी साधतो व सापाची शिकार करतो, पण समुद्री सापांची संख्या कमी होत आहे कारण मोठ्याप्रमाणात होणाऱ्या मासेमारीमुळे, कोळ्यांच्या जाळ्यात अडकून समुद्री सापांचा मृत्यू होतो आणि साहजिकच यांचा परिणाम समुद्र गरुडाच्या संख्येवर होत आहे असं जाणवत.

कोकणात सायकल प्रवासावर होतो २०१४ मधील डिसेंबर महिना होता. गोव्यावरून निघून मजल दरमजल करत रात्रीच्या मुक्कामाला सिंधदुर्गमधील संगरतीर्थ येथील समुद्रकिनारी पोहचलो. अंधारून आले नव्हते म्हणून आम्ही सर्व जवळचा समुद्र किनाऱ्यावर पोहोचलो. उंच उंच झाडाचा गर्दीतून किनाऱ्यावर येऊन निवांत बसलो तेवढ्यात आकाशातून एका गरुडाने पाण्यावर झेप घेतली व पायात एक समुद्र साप घेऊन तो आमचा दिशेने निघाला. अंधारून आले असल्यामुळे प्रयत्न करून एकच फोटो मिळाला, गरुड हा साप घेऊन उंच झाडावर उतरला, फोटो तपासून पाहिल्यावर हा समुद्र गरुड असल्याचं समजल.

धामण (Rat snake) साप मानवाच्या वस्ती जवळपास नेहमी दिसतो. बिनविषारी असलेला धामण साप दिवसासुद्धा क्रियाशील असतो आणि यामुळेच असेल कदाचित की धामण साप आणि पक्षी हा संघर्ष खूप वेळा पाहण्यास मिळाला आहे. झाडावर चढण्यात धामण खूप पटाईत असते व घात लावून विसावा घेत असलेल्या पक्ष्यांची झाडावर शिकार करते तर कधी त्याचा घरट्यातील अंडे खाते, फेब्रुवारी २०१७ ची घटना आहे मी अकोल्यावरून अकोटमार्गेपोपटखेड जात असताना अकोट शहराच्या बाहेर कडुलिंबाचा झाडांची दुतर्फा रांग आहे त्यातला एका झाडाच्या खाली दहा बारा माणसं जमा झाली होती आणि वर झाडाच्या शेंडयाकडे पाहत होती. जवळ गेलो असता दिसले की झाडाच्या वरच्या शेंड्यावर खाली तोंड केलेली एक धामण साप आणि तिच्या तोंडात पोपट (Ringrose parakeet) सापाने पोपटाचा अर्धा भाग गिळला होता, परंतु खाली उभ्या माणसांचा गोंधळ व संख्या वाढत गेली आणि सापाने पोपटाला बाहेर काढून झाडाच्या ढोलीत गायब झाला. पोपट खाली पडला तो आधीच मेलेला होता. कदाचित सापाने पोपट जिवंत पकडला असावा आणि नंतर त्याचा गुदमरून जीव घेतला व त्याला खाणे चालू केले असावे; पण माणसाच्या उपस्थितीमुळे पोपट न खाता साप निघून गेला.

एकदा तर अगदी जवळून धामण साप झाडावर कसा चढतो हे पाहण्याचा अनुभव मिळाला, मी कृषी विद्यापीठ अकोला येथे तलावावर झुडपात बसून टिबुकली (Little Greab) या पक्षी पाहत बसलो होतो. अचानक माझ्यापासून दोन हात असणाऱ्या लिंबाच्या झाडावर हलचाल दिसली पहिले तर धामण झाडावर अगदी सहज उभी चढली आणि नंतर काही वळण घेत वर गेली झाडावर सुगरण (Baya weaver) ची लटकलेली घरटी होती धामण बरोबर घरटे असलेला फांदीचा खालील फांदीवर गेली व मानेसहित शरीर उचलून घरट्यात काही आहे का पाहत होती; पण ती सर्वच अर्धवट बनलेली रिकामी घरटी होती. त्यामुळे धामण वापस वळली.

जमिनीवर राहणाऱ्या पक्ष्यांच्या पिल्लं अंडासाठी साप हा प्रमुख शत्रू आहे. यात टिटवी, माळटिटवी आणि साप हा संघर्ष अनेक वेळा पाहण्यास मिळाला आहे, बऱ्याच वेळेला फक्त टिटवी, माळटिटवी यांच्या विशिष्ट अशा आवाजामुळे सापाचे मैदानावरील अस्तित्व लक्षात आले आहे, टिटवीचा आवाजामुळे सर्वच पक्षी सतर्क होतात, साप दिसताच अंडी व पिलांचा बचावासाठी टिटवी त्याला सामोरी जाते दोन्ही पंख विस्तारून समोर उभी राहते तर दुसरी टिटवी हवेत उडत सापावर हवेतून हमला करते, बहुतेक वेळा

टिटवीचा हमल्यावर सापसुद्धा मान उंचावून टिटवी वर हमला करतो, टिटवी चपळाईने वार चुकवते व साप घरट्यापासून दूर जाई पर्यंत हा संघर्ष चालू असतो.

जंगल, तलाव, समुद्र, गवताळ प्रदेश अशा विविध अधिवासात साप आणि पक्षी हे त्या परिसंस्थेचे अविभाज्य भाग आहेत ते सोबत उत्क्रांत झाले आणि एकमेकांची भूक भागवत सहउत्क्रांत होत गेले, या नात्याचे हजारो पैलू आहेत आणि तो प्रत्येक पैलू अभ्यासला जाऊ शकतो, साप आणि पक्षी तसेच पक्षी आणि झाड हे नातंसुद्धा अतिशय सुंदर आहे. अनेक पक्ष्यांची चोची शरीर रचना ही फुलातील मधुर रसपान करण्यासाठी विकसित झाली तर बऱ्याच फुलणाऱ्या झाडांनी परागीभवन विशिष्टीत पक्ष्यांनीच करावे म्हणून स्वतःचा फुलांमध्ये विशिष्ट बदल करून घेतले आहे, फळांनी लदबदण्याचा झाडांचा ऋतू आणि पक्षांनी पिलांचे या मधुर फळांनी संगोपन करण्याचा काळ, या खाल्लेल्या फळातून होणारे झाडांचे दूरदूर बीज प्रसारण किती बेमालूमपणे हे मिसळले गेले आहे.

निसर्गात अशी अनेको नाजूक सुंदर नाती आहेत, यांच्यातील सह - संबंध मानवाने लक्षात घेतला तर ठीक आहे नाहीतर एका पक्षी प्राणी जाती सोबत आपण हजारोना गमवून बसतो, म्हणून घटना घडून घेल्यानंतर विचार कृती करण्यापेक्षा आताच कामाला लागू आणि या सुंदर नात्यातील आपणही एक भाग होऊ.

*****

## पृथ्वीची आर्त हाक...
## पक्षी वाचवा निसर्ग वाचवा २० मार्च
## जागतिक चिमणी दिवस

**- सौ अश्विनी पाटील**
पक्षी मित्र व निसर्ग संवर्धक
चोपडा (जळगाव)

आपण राहत असलेल्या परिसरातील जैव साखळीतील महत्त्वाचा घटक म्हणजे पक्षी. या पक्ष्यांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर घटत आहे. विशेषतः सहजपणे दिसणाऱ्या चिमण्या व अनेक सामान्य पक्षी शहरी भागामध्ये अनेक कारणांनी नष्ट होत आहेत. जसे की साधी घरे नष्ट करून त्याऐवजी सिमेंटची घरे उभारणे, मोबाईल टॉवर्स, वृक्षतोड, अवकाळी पाऊस, गारपीट, प्रतिकूल हवामान, नैसर्गिक अधिवास नष्ट करणे, ऋतुचक्रातील बदल, वाढते ध्वनी व वायू प्रदूषण, तप्त उन्हाळा इत्यादी.

अशा परिस्थितीमध्ये आपण या मुक्या सजीवांबद्दल संवेदनशीलता व जिव्हाळा राखत त्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी अतिशय सोपे पण महत्त्वपूर्ण प्रयत्न करूया. भर उन्हाळ्यात पक्ष्यांना पुरेसे पाणी भरलेली मातीची भांडी घराच्या छतावर, बाल्कनीत, अंगणात तसेच झाडांवर लावून ठेवता येतील . त्याच बरोबर अन्नधान्याने (बाजरी - तांदूळ) भरलेला ट्रे, ग्रेन फीडर्स लावता येतील. पक्ष्यांसाठी मातीची अथवा लाकडाची कृत्रिम घरटी लावणे शक्य आहे. उष्माघातामुळे अस्वस्थ पक्षी किंवा जखमी असहाय्य पक्ष्यांवर प्रथमोपचार करता येईल. अशारीतीने निसर्गातील या सुंदर, आकर्षक, रंगीबिरंगी, आपल्या सर्वांना उपयुक्त अश्या वसुंधरेच्या अलंकाराचे जतन करूया, संवर्धन करू या.

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीदेखील आम्ही 'जागतिक चिमणी दिवसा'निमित्त १११ मातीचे जलपात्र व कृत्रिम घरटी आमच्या गावात मोफत वितरित करत आहोत. आपणही आपल्या परीने हे अभियान आपल्या गावी राबवावे अशी नम्र अपेक्षा.
'मिळून सारे जण, करूया द्विजगण रक्षण'



# ३४ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन सोलापूर



**– डॉ. व्यंकटेश मेतन**
अध्यक्ष: डॉ. मेतन फाउंडेशन, सोलापूर
९३७००८००९०

३४ वे महाराष्ट्र राज्यस्तरीय पक्षिमित्र संमेलन डॉ. मेतन फाउंडेशनच्या वतीने सामाजिक वनीकरण सोलापूर व महाराष्ट्र वन विभाग सोलापूर यांच्या सहकार्याने सोलापूर येथे दिनांक ७, ८ व ९ जानेवारी २०२२ रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह, सोलापूर येथे यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आले. कोरोनाच्या काळातील सरकारने सूचित केलेल्या सर्व नियमांचे पालन करून हे संमेलन यशस्वीरीत्या पार पडले. या संमेलनामध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून आणि काही इतर राज्यात मिळून २३९ पक्षिमित्रांनी सहभाग घेतला होता.

शुक्रवार ७ जानेवारी रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे मामा, राज्यमंत्री : वनविभाग तथा पालक मंत्री सोलापूर जिल्हा यांच्या हस्ते या संमेलनाच्या कार्यशाळेचे उदघाटन करण्यात आले. सोलापूर जिल्ह्यात तब्बल ३७३ प्रकारच्या पक्ष्यांच्या प्रजाती आढळतात. या सर्व प्रजातींचे संरक्षण आणि संवर्धन करण्याकरिता शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य करू, असे आश्वासन वनराज्यमंत्री आणि पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.यावेळी व्यासपीठावर डॉ. मेतन फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश मेतन, संमेलनाचे अध्यक्ष डॉ. निनाद शहा, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर, उपवन संरक्षक धैर्यशील पाटील, विभागीय वन अधिकारी मनीषा पाटील उपस्थित होते. डॉ. मेतन फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश मेतन यांनी प्रास्ताविक केले. अभिज भानप यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.शुक्रवारी ७ जानेवारी या रोजी पक्षिमित्रांसाठी दोन कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. यामध्ये जखमी पक्ष्यांची निगा कशी राखावी व फोटो एडिटिंग या विषयांवर कार्यशाळा झाल्या.जखमी पक्ष्यांवर उपचार आणि निगा कशी राखावी या विषयावरील कार्यशाळेत डॉ. शिवानी तांडेल (मुंबई), डॉ. संजय गायकवाड (नाशिक) आणि राजकुमार कोळी (सोलापूर) यांनी मार्गदर्शन केले.तसेच फोटो एडिटिंग कार्यशाळेत बंगळुरू येथील अनंत मूर्ती, अरुण सामक आणि सोलापुरातील आनंद मादास यांनी मार्गदर्शन केले. नैसर्गिक अधिवासातील पशू पक्ष्यांचे फोटो कसे घ्यावेत, ते संपादित कसे करावेत याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. ह्या दोन्ही कार्यशाळा उत्तमपणे पार पडून त्यामधील माहिती व त्याचा फायदा उपस्थित सर्व सदस्यांना झाला.शनिवार ८ जानेवारी रोजी या संमेलनाचे स्वागताध्यक्ष जिल्हाधिकारी मा. श्री. मिलिंद शंभरकर यांच्या हस्ते पक्षिमित्र संमेलनाचे थाटात उद्घाटन करण्यात आले. महाराष्ट्र राज्यस्तरीय पक्षिमित्र संमेलनास महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातून आलेल्या सायकल रॅलीचे स्वागत एमआईटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन पुणेचे सचिव मा. प्रा. सौ. स्वाती कराड चाटे यांनी केले. डॉ. मेतन फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश मेतन यांनी प्रास्ताविक केले. मानवी जीवनात निरनिराळ्या प्रजातीच्या पक्ष्यांचे अस्तित्व हाच मानव पक्षी संवादाचा मार्ग आहे, असे मत जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी व्यक्त केले. जिल्हाधिकारी श्री. शंभरकर म्हणाले, माणसाने साद घातली की निसर्ग प्रतिसाद देतो. पक्षी संवर्धनासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. सोलापूर हे पक्ष्यांचे माहेरघर आहे. येथील पक्षी वैभव मोठे आहे. पक्ष्यांना पूरक परिसंस्था निर्माण केल्यास पक्षी समाजात सहजतेने वावरतील. निसर्ग कल्याणा प्रमाणेच मानव कल्याणाचाही हेतू या पक्षिमित्र संमेलनाचा आहे, असेही ते म्हणाले. या कार्यक्रमात संमेलनाच्या बोधचिन्हाचे 'माय स्टॅम्प' हे भारतीय पोस्टाचे टपाल तिकीट प्रकाशित करण्यात आले. या कार्यक्रमात महाराष्ट्र पक्षिमित्रच्या चार दशकपूर्ती विशेषांकाचे आणि दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. या संमेलनांचे अध्यक्ष डॉ निनाद शाह यांनी त्यांचे अध्यक्षीय भाषण वाचले. निसर्गनिर्मित, मानवनिर्मित संकटांमुळे पक्षी धोक्यात येत आहेत. यावर उपाय म्हणून पक्षिमित्र कार्य करतात. पक्ष्यांसाठी तालुका पातळीवर रेस्क्यू सेंटर व्हावे, अशी मागणी संमेलनाचे अध्यक्ष डॉ. निनाद शहा यांनी केली. संमेलनाच्या उद्घाटनावेळी व्यासपीठावर डॉ. मेतन फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश मेतन, संमेलनाचे अध्यक्ष डॉ. निनाद शहा, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर, माजी संमेलनाध्यक्ष डॉ. राजू कसांबे, उपवन संरक्षक

धैर्यशील पाटील, एमआयटीच्या पर्यावरण विभाग प्रमुख प्रा. स्वाती कराड, एनटीपीसीचे चीफ जनरल मॅनेजर एन. श्रीनिवास राव, किर्लोस्कर कंपनीचे फॅक्टरी मॅनेजर विलास खरात, झुआरी सिमेंट युनिटचे श्री. कक्कर उपस्थित होते. अभिज भानप यांनी सूत्रसंचालन व पत्रकार विनोद कामतकर यांनी आभार प्रदर्शन केले.

दिनांक ८ व ९ जानेवारी रोजी पक्षी या विषयांवर व्याख्याने, शोध निबंध, मुलाखत आणि चर्चासत्र आयोजित करण्यात आली. या संमेलनात महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे उद्देश साध्य करून सोलापूर हे पक्ष्यांचे नंदनवन आहे हा संदेश देण्यात आला.

**यामधील ठळक विषयांवरील माहिती पुढीप्रमाणे–**

माणसाने केलेली घाण स्वच्छ करण्याचे काम निसर्गातील पक्षी करतात. अशा वन्यजीवांमुळे मनुष्य जीवन सुखकर होते, असे प्रतिपादन प्रधान मुख्य वनसंरक्षक सुनील लिमये यांनी केले. श्री. लिमये यांनी पक्षिसंवर्धन या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, ‘पशू–पक्ष्यांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी समाजाचा अभ्यास आणि प्रबोधन होणे अत्यावश्यक आहे प्रत्येक पशू–पक्ष्यांला त्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांची जागा देणे अत्यंत आवश्यक आहे जैवविविधतेमध्ये पक्ष्यांचे स्थान खूप मोठे आहे ते स्थान जर आपण सांभाळले तर आपण खूप चांगल्या पद्धतीने पक्षिवैभव टिकवण्यात यशस्वी होऊ. अनेक शहरांमध्ये बिबळ्या शिरण्याच्या घटना वाढत आहेत. यावरून बिबळ्या शहरात शिरला असा सरसकट निष्कर्ष आपण काढतो. परंतु भौतिक विकासासाठी मानवाने या वन्यजीवांच्या प्रदेशात शिरकाव केल्यामुळे हे वन्यजीव शहरात प्रवेश करत आहेत, याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे व आपण बिबळ्याच्या प्रदेशात आपणच शिरलो’, असे राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक सुनील लिमये यांनी यावेळी सांगितले.

**अरण्यऋषी चित्तमपल्ली यांनी समजावले पक्षीनिरीक्षणाचे सूत्र :**

अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांची प्रकट मुलाखत डॉ. मेतन फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश मेतन यांनी घेतली. यावेळी मारुती चितमपल्ली यांनी पक्षिनिरीक्षणाचे सूत्र उपस्थितांना समजावले. पक्ष्यांना ग्रह, तारे पाहून दिशा ओळखता येतात. हजारो किलोमीटरवरून स्थलांतरित होऊन येणारे पक्षी ठराविक काळानंतर पुन्हा आपल्या अधिवासात अचूकपणे जातात हे पक्ष्यांचे मोठे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. पक्षी कुठे पाहिला, त्याचा रंग, आकार कसा आहे या सगळ्याची नोंद पक्षी निरीक्षण करताना डायरीमध्ये करायला हवी. या डायरीच्या आधारेच भविष्यात पक्षी निरीक्षण या विषयाचे निष्कर्ष आपल्याला मांडता येतात, असेही श्री. चित्तमपल्ली यावेळी म्हणाले. यावेळी महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे श्री. बापूसाहेब भोसले आणि पक्षीमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांच्या हस्ते श्री. मारुती चित्तमपल्ली यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.गवताळ प्रदेशाची जैवविविधता टिकून राहण्यासाठी गवताळ प्रदेश महत्त्वाचा या विषयावर एस. एच. पाटील याचे व्याख्यान झाले. निसर्गातील जैवविविधता टिकून राहण्यासाठी गवताळ प्रदेशाचे अस्तित्व महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन एस.एच. पाटील यांनी केले. गवताळ प्रदेशाचे पर्यायाने जैवविविधतेचे अस्तित्व राखण्यासाठी गवताळ प्रदेशाचे अग्नीपासून संरक्षण करणे, काही उपयुक्त वनस्पती लागवड असे उपाय करता येतील. आर्य चाणक्य यांनीदेखील आपल्या कौटिल्यीय अर्थशास्त्र या ग्रंथात राखीव कुरणाचेच महत्त्व सांगितल्याचे श्री. पाटील यावेळी म्हणाले. रविवारी ९ जानेवारी रोजी पक्षी निरीक्षण भ्रमंतीसाठी सकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत हिप्परगा तलावाची भ्रमंती, सिद्धेश्वर वनविहाराची भ्रमंती व माळरानावर भ्रमंती आयोजित करण्यात आली होती. यामध्ये ७० सदस्यांनी भाग घेऊन पक्षिनिरीक्षणाचा आनंद लुटला.

ह्या दिवशी झालेल्या विविध व्याख्यानांमधील काही ठळक बाबी पुढील प्रमाणे.शहरामध्ये वाढत जाणारी पारव्यांची संख्या ही मोठी चिंतेची बाब बनली आहे. पारव्याच्या विष्ठेमुळे आजार पसरण्याचाही धोका असतो. म्हणून नागरिकांनी पारव्यांना अन्न न देता फक्त पाणीच द्यावे, असे आवाहन अमरावतीचे पक्षिप्रेमी सौरभ जवंजाळ यांनी केले.

महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाच्या समारोपाच्या दिवशी ते बोलत होते. पक्ष्यांना अन्न दिल्याने आपल्याला पुण्य लाभते या समजुतीतून अनेक लोक पारव्यांना खाद्य देतात. त्यामुळे त्यांची संख्या वाढत चालली आहे. पुण्य कमवावयाचेच असेल तर त्यांना अन्न न देता फक्त पाणी द्यावे. त्यांचे अन्न शोधण्यासाठी ते सक्षम असतात. आपण त्यांना अन्न देऊन त्यांच्या नैसर्गिक कार्यात अडचणी निर्माण करुन त्यांना अपंग करू नका. घर बांधण्याच्या पद्धतीत बदल करून पारवा पक्ष्यांची तेथे अंडी घालू नये यासाठी व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे सौरभ जवंजाळ यांनी सांगितले.राज्यातील छोटी माळराने व पाणथळीच्या जागांचे सर्वेक्षण करून त्यांच्या याद्या तयार केल्या जातील. तसेच स्थानिक

लोकांच्या मदतीने त्या सांभाळण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यामध्ये पाणथळ व माळराने राखली जावीत. तसेच शेतकरी पक्षिमित्र संमेलन व विद्यार्थी पक्षिमित्र संमेलने काही जिल्ह्यात सुरू झाली आहेत. ती सर्व जिल्ह्यात होतील.

**घुबडाची अंधश्रद्धा चुकीची :**

इला फाउंडेशनचे डॉ. सतीश पांडे यांनी घुबडाच्या अधिवासाबद्दल सांगितले. या पक्ष्यांचा अधिवास स्मशानात सर्वाधिक असतो. कारण, ढोली असलेली, स्थानिक प्रजातींची मोठी झाडं तेथे असतात. त्याचे डोळे गडद लाल असतात म्हणून लोक भितात. तसेच त्यांच्याबद्दल अंधश्रद्धा पसरवतात. घुबडाला मारण्याचे प्रकार होतात. घुबड हे अशुभाचे प्रतीक आहे, ही अंधश्रद्धा थांबवली पाहिजे. निसर्गप्रेमींनी लग्न पत्रिकेवर घुबडाचा फोटो छापून अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. पुण्यामध्ये वन्यजीवांसाठी लवकरच रेस्क्यू सेंटर सुरू करण्यात येणार आहे. वनविभाग, इला फाउंडेशन व सीम इन्स्टिट्यूट यांच्या सहकार्याने पुण्यात तो मोठा प्रकल्प होणार असल्याचे, डॉ. पांडे यांनी सांगितले.

वाईल्ड लाईफ फोटोग्राफीसाठी भरपूर निरीक्षण करत असतानाच मोबाईलऐवजी कॅमेराचा उपयोग प्रभावी असल्याचे मत डॉ. मेतन फाउंडेशनचे संस्थापक डॉ. व्यंकटेश मेतन यांनी व्यक्त केले. केवळ फोटो काढण्याची घाई न करता कॅमेऱ्याने चांगली गुणवत्ता मिळवावी. तसेच फोटो माध्यमावर देण्यापूर्वी त्या पक्ष्यांची माहिती संकलित करुन ती फोटो सोबत जोडावी म्हणजे इतरांना पक्ष्याबद्दलचे ज्ञान मिळेल. छायाचित्रे काढण्याअगोदर पक्ष्यांची संपूर्ण माहिती आणि अभ्यास करावा. असे केल्याने चांगली छायचित्रे काढण्यास मदत होते. छायाचित्रे काढताना जंगलातील शिष्टाचार पाळणे फार गरजेचे आहे, असे मत मांडले.

नान्नज अभयारण्यातील वन्यजीव अभ्यास, संशोधन कार्याबद्दल अभ्यासक सारंग म्हमाणे यांनी माहिती दिली. गवताळ माळरानावरील ‘वाघ’अशी उपाधी असणारा लांडगा प्राण्याला रेडी कॉल रिंग करणे, माळढोक पक्ष्यांच्या निरीक्षण नोंदी, खोक प्राण्याचा अभ्यास याबाबतची माहिती दिली. वन्यजीव अभ्यास बाळासाहेब लांमतुरे यांनी पक्ष्यांचा विणीचा हंगाम, घरटी व पिल्लांचे संरक्षण याबाबत माहिती दिली. शिकारी पक्ष्यांना हुलकावणी देण्यासाठी माळरानावरील छोटे पक्षी स्वत: जखमी असल्याच दिखावा करीत शिकाऱ्यांचे लक्ष विचलित कसे करतात, याबाबतची माहिती दिली. प्रा. धनंजय शाह यांनी जगातील विविध पोस्टाच्या पक्ष्यांच्या तिकिटांचा संग्रह या विषयावर उत्तम दिग्दर्शन केले. दुर्मीळ १०० पक्ष्यांच्या तिकिटांचे महत्त्व पटवून दिले.पक्ष्यांच्या संवर्धनात माध्यमांचे योगदान या विषयावर बोलताना ‘दिव्य मराठी’चे विनोद कामतकर म्हणाले, चिऊ-काऊच्या गोष्टी, अंगाई ऐकत आपण मोठे होतो. शालेय जीवनात नकळत चित्र काढताना पोपट, चिमण्या रेखाटतो. कथा, कादंबरी, मासिक या साहित्याद्वारे पक्ष्यांबाबतही माहिती मिळते. चित्रपटांसह, गाण्यांमध्ये पक्ष्यांचा उल्लेख आवर्जून असतोच. सरस्वतीचे वाहन मोर, घुबड लक्ष्मीचे वाहन आहे. रावणाच्या तावडीतून सीतेला वाचविण्यासाठी जटायू पक्षी पुढे सरसावला, अशा धार्मिक व पौराणिक कथांमधून पक्ष्यांची महती समोर येते. वृत्तपत्रांमध्ये पक्ष्यांचे छायाचित्र प्रसिद्ध करण्यासह, त्यांची शास्त्रीय माहिती देऊन वाचकांमध्ये निसर्ग भान जपण्यात माध्यमांचे योगदान असल्याचे, त्यांनी सांगितले.

या संमेलनाचे बोधचिन्ह म्हणून सापमार गरुड (शॉर्ट टोड स्नेक ईगल) याची निवड केली होती. सोलापुरातील वनक्षेत्र हे उत्तर १.८% असून येथे ३५७ प्रजातींचे पक्षी आढळतात. यामुळेच सोलापूर हे पक्ष्यांचे माहेरघर आहे असे प्रसिद्ध पक्षितज्ज्ञ व पक्षिमित्र श्री. सालीम अली यांनी म्हटले होते. सोलापूर जिल्हा माळरान व गवताळ प्रदेश व त्यावरील जैविक विविधता यासाठी समृद्ध असून या माळरानावर अनेक शिकारी पक्षी आढळतात. यामधील सापमार गरुड पक्षी या माळरानावरील वैभव म्हणून ओळखला जातो. या संमेलनाची संकल्पना माळरान- शिकार पक्षी-संवर्धन अशी ठेवण्यात आली होती. या संमेलनाच्या अगोदर शालेय विद्यार्थ्यांना, कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी पक्षिमित्र संमेलन घेण्यात आले. या उपक्रमातून पक्षी हा आपल्या निसर्गातील एक महत्त्वाचा घटक असून त्याचे संरक्षण, संगोपन व संवर्धन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे हा संदेश आम्ही दिला. प्रख्यात पक्षिमित्र श्री. मारुती चितमपल्ली व श्री. बी.एस. कुलकर्णी या दोन व्यक्तींच्या सन्मानार्थ दोन सभागृहांना त्यांची नावे देण्यात आली होती.

या संमेलनातील कार्यक्रमाळची आखणी करण्यासाठी डॉ. निनाद शाह, प्रा. धनंजय शहा, सिद्धाराम पुराणिक, मनोज कुलकर्णी, विनोद कामतकर, परशुराम कोकणे, श्री. राजकुमार

कोळी, अनिल जोशी, संजय भोईटे, सचिन जोग, रेश्मा माने, नरेंद्र गायकवाड, बाड कुटुंब, बाळासाहेब लामतुरे, कु. श्रद्धा सक्करगी, अजय हिरेमठ, सोमेश्वर लवंगे, सिद्धाराम सक्करगी, चिदानंद मुस्तारे यांनी परिश्रम घेतले.या तीन दिवसीय संमेलनाचे आयोजन यशस्वी करण्यासाठी डॉ. मेतन फौंडेशनचे सर्व ट्रस्टी, श्री. सोमेश्वर लवंगे, श्री. अभय दिवाणजी, श्री. प्रल्हाद कांबळे, श्री. सिद्धाराम सक्करगी, श्री चिदानंद मुस्तारे, श्री. राजगोपाल झंवर, श्री. सिद्धेश्वर वाले, महेश बनसोडे, श्रीनिवास येले, सौ. वीणा, सौ. विद्या मणुरे, सौ. सविता लवंगे, राघवेंद्र मेतन, गिरीश मेतन यांनी खूप परिश्रम घेतले. संपूर्ण यशस्वीतेसाठी सौ वीणा मेतन यांनी अहोरात्र प्रोत्साहनपर सहकार्य केले. करोनासारख्या काळात हे संमेलन यशस्वीपणे पार पडले. या संमेलनाच्या माध्यमातून पक्ष्यांबद्दल आयोजित अनेक महत्त्वाच्या विषयांवरील माहिती समाजापर्यंत उत्तम संदेश देण्यात आला. यासाठी सोलापुरातील सर्व वर्तमानपत्रे, टीव्ही च१ॅनेल यांचा मोठा वाटा आहे. महाराष्ट्र पक्षीमित्र राज्य संघटनेने ३४वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन आम्हा सोलापूरकरांना आयोजन करण्याची दिलेली संधी आम्ही अत्यंत उत्तमरीत्या पार पाडून हे संमेलन यशस्वी केले. महाराष्ट्र पक्षीमित्र राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर, श्री. धैर्यशील पाटील, उपसंरक्षक महाराष्ट्र वन विभाग सोलापूर, सौ. मनीषा पाटील, विभागीय अधिकारी सामाजिक वनीकरण सोलापूर यांची मोलाची साथ, सहयोग व मार्गदर्शन मिळाले. आम्हास महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेकडून सहकार्य मिळाले.

*****

## आपल्या माहितीला उजाळा- भाग ३

महाराष्ट्र पक्षीमित्रसंघाच्या त्रैमासिकेचे प्रायोजन केवळ पक्षी निरीक्षण व ओळख या पर्यंतच मर्यादित राहत नाही. त्या सल्गनीत ज्ञान भांडाराची उजळणी करून घेण्यासाठी आपल्या माहितीला उजाळा हे सदर वाचकांच्या पुढ्यात ठेवत आहे. प्रत्येक अंकामध्ये दहा प्रश्नांचा संच दिला जाईल. वाचकांना त्याची उत्तरे शोधून आपल्याकडे असणाऱ्या महितीला उजाळा द्यायचा आहे.प्रत्येक प्रश्नासोबत पुरविलेला सुगावा संपूर्ण क्रियाकलापास रंजक बनवतील अशी अपेक्षा आहे. वाचकांनी आपली उत्तरे अंकामध्ये इतरत्र दिलेल्या उत्तरासोबत पडताळून पाहू शकतो. या सदराबद्दल प्रश्न, चर्चा किंवा सूचनांचे स्वागत आहे.

| क्र. | प्रश्न | थोडी मदत |
|---|---|---|
| १) | जागतिक पोपट दिन....या दिवशी साजरा करतात.. | पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा जन्मदिन. |
| २) | 'धनेश' पक्षी जीवशास्त्रीय वर्गीकरणातल्या .................... या कुटुंबात गणला जातो. | धनेशाचे केवळ एकच कुटुंब आहे |
| ३) | भारतीय वायू दलातील ध्रुव या हेलीकॉप्टरवर कोणत्या पक्ष्याचे चित्र आहे. | हा पक्षी पावसाळ्यात नाचतो |
| ४) | गटात न बसणारा पक्षी ओळखा नकटा , गजरा , टिबुकली, चक्रवाक, भुवई | इतर सर्व बदकं आहेत |
| ५) | आंतरराष्ट्रीय पक्षिशास्त्र संघाची २०२२ सालची महासभा ...................... येथे होणार आहे. | दक्षिण आफ्रिकेतील एक शहर |
| ६) | पंखांच्या रचनेबद्दलच्या अभ्यास पद्धतीला...... असे म्हणतात. | फ्रँक ईलीएट पारसन्स यांनी १९४०च्या दरम्यान या अभ्यासाची सुरुवात केली. |
| ७) | पुद्दुचेरीचा राज्यपक्षी कोणता? | या पक्ष्याचा नर सुरेख गातो |
| ८) | Rostratulidae या पक्षी कुटुंबात...यांचा समावेश होतो. | हा खूप लाजरा पक्षी आहे |
| ९) | Western Osprey या पक्ष्याचे मराठी नाव काय? | या पक्ष्याला मासे खूप आवडतात |
| १०) | 'इम्प्रीटिंग' या वागणुकीमध्ये नवजात बदके पालकांचा पाठलाग करतात,याचा शोधलावणारे प्रसिद्ध जीवशास्त्रज्ञ कोण? | वागणूक शास्त्र म्हणजे 'ईथॉलॉजी' या अभ्यास शाखेचे जनक. |

# ३४ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन, सोलापूर : क्षणचित्रे



३४ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. दत्तात्रय भरणे मामा, संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. निनाद शहा म.प. चे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर, आयोजक संस्थेचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश मेतन उपवनसंरक्षक श्री. धैर्यशील पाटील



३४ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक सोलापूरचे जिल्हाधिकारी मा. मिलिंद शंभरकर, संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. निनाद शहा व इतर मान्यवर



महाराष्ट्र पक्षिमित्रच्या चार दशकपूर्ती विशेषांकाचे प्रकाशन, ३४ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी करतांना मान्यवर



३४ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. निनाद शहा यांना कार्यभार सोपवितांना मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. राजू कसंबे



महाराष्ट्र पक्षिमित्रचा जीवनगौरव पुरस्कार आदरणीय मारुती चितमपल्ली यांना प्रदान करतांना महाराष्ट्र पक्षिमित्रचे जेष्ठ सल्लागार श्री. बापूसाहेब भोसले आणि अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर



३४ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. निनाद शहा आपले अध्यक्षीय भाषण करतांना.

# ३४ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन, सोलापूर : क्षणचित्रे



३४ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी प्रास्ताविक करतांना डॉ. मेतन फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश मेतन.




३४ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनामध्ये मार्गदर्शन करतांना प्रमुख अतिथी, राज्याचे प्रधान मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव) मा. सुनील लिमये




३४ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनामध्ये मार्गदर्शन करतांना प्रमुख अतिथी, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष मा. शेषराव पाटील



३४ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनामध्ये महाराष्ट्र पक्षिमित्रची आमसभा पार पडली. यावेळी उपस्थित महाराष्ट्र पक्षिमित्रचे कार्यकारी मंडळ.




महाराष्ट्र पक्षिमित्रचा पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार प्राप्त श्री. उदय चौधरी यांनी आपली पुरस्काराची रक्कम पक्षी संवर्धन कार्यासाठी महाराष्ट्र पक्षिमित्रकडे सुपूर्द करतांना.



महाराष्ट्र पक्षिमित्रचा पक्षी संशोधन पुरस्कार प्राप्त प्रा. डॉ. अमोल रावणकर यांनी आपली पुरस्काराची रक्कम पक्षी संवर्धन कार्यासाठी महाराष्ट्र पक्षिमित्रकडे सुपूर्द करतांना.

# ३४ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे अध्यक्ष प्रा.डॉ. निनाद शहा यांचे मनोगत

गेल्या ३६ वर्षापासून महाराष्ट्र पक्षिमित्र चळवळीशी संबंध असलेले निनाद शहा प्राणिशास्त्राचे प्राध्यापक व महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्यरत होते. WWF च्या National Leadership Nature Camp, ND-,Pune येथील सात दिवसांच्या शिबिरात रमेश लाडखेडकरांचा त्यांना सहवास लाभला आणि ते पक्षिमित्र चळवळीत आले. पक्षी, पर्यावरण अभ्यासासाठी विहंग मंडळाची स्थापना केली व त्याद्वारे हिप्परगा, होटगी तलाव परिसरात निसर्ग शिबीरे भरविली. आपले १६ वे पक्षिमित्र संमेलनाचेही यशस्थी त्यांनी आयोजन केले. ते BNHS चे आजीव सभासद आहेत. माळढोक संरक्षण, संवर्धन विषयक विविध समित्यांवर कार्यरत. जिल्हा जैवविविधता मंडळ, टायगर सेल, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रणाच्या काही समितीयर कार्य. सोलापूर विद्यापीठासाठी पर्यावरण शास्त्रावर मराठी व इंग्रजीतून पुस्तकांचे लेखन व संपादन. प्राणी शास्त्राच्या ४ पुस्तकांचे व Environmental Science आदी पुस्तकांचे सहलेखन, ३ पक्षीसूची प्रसिद्ध केल्या आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सेमिनार्स, वर्क्सशॉपमधून प्राणिशास्त्राबरोबर पक्षी, फुलपाखरे विविधतावर संशोधनपर निबंध सादरीकरण. UNO R MOEF, Govt. of India संचलित Inland Wetlands of India प्रकल्पात सहभाग. पर्यावरण पत्रकारिता, पक्षी, जैवविविधता आदींवर विद्यापीठ व विविध कॉलेजेसमधून सेमिनार्स, वेबिनार्समध्ये अभ्यासपूर्ण व्याख्याने/सादरीकरण. पक्षी, पर्यावरण यावर वर्तमानपत्रे, नियतकालिकातून २००+ लेखन तर आकाशवाणी, स्थानिक चॅनेल्स, विविध शिबिरे, विद्यापीठ, कॉलेज, शाळांमधून २२५+ व्याख्याने, वनखात्याच्या प्राणी, पक्षी गणनेसह विविध प्रकल्प, कार्यक्रमात नेहमीच सहभाग सोलापूर जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक म्हणून दहा वर्षेकाम जखमी पक्षी शुश्रूषा कार्यात सहभाग..

या संमेलन स्थळालगत असलेल्या तलावाचे निमति असलेल्या श्री सिध्देश्वरांच्या पावन नगरीत, स्वातंत्र्यासाठी जीवाची बाजी लावलेल्या चार हुतात्म्यांच्या गावात आणि स्वातंत्र्यपूर्व काळात तीन पूर्ण दिवस (९ ते ११ मे, १९३०) स्वातंत्र्य भोगलेल्या क्रांतिकारी सोलापूर शहरात ३४ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन भरते आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. समेलनाध्यक्षपदी माझी निवड केली हा मी माझा बहुमान समजतो. इये सोलापूरचिये नगरी मी सन्माननीय पाहुणे, महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे पदाधिकारी व आपण सर्व पक्षीप्रेमी सर्वांचे स्वागत करतो. सर्वांना नमस्कार...शरणू शरणार्थी..

संमेलनाची तयारी जवळजवळ पूर्ण झाली असताना, कोरोनाच्या महाआपत्तीमुळे संमेलनाच्या तारखा दोनदा पुढे ढकलाय्या लागल्या. पण आयोजक मेतन फाऊंडेशनने हतोत्साहीत न होता पुन्हा पुन्हा नेटाने तयारी करुन हे संमेलन आयोजित केले आहे. यातून कितीही व कशीही संकटे आली. तरी पक्षिमित्र चळवळ चालूच ठेवण्याची त्यांची धडपड दिसते. डॉ. मेतन फाऊंडेशन व त्यांचे सहकारी यांना त्यासाठी धन्यवाद दिलेच पाहिजेत. आपणही त्यास उत्तम प्रतिसाद देऊन आलात. याबद्दल अतीव आनंद वाटतो आहे.

मी माढा गावचा. पाचवीपर्यंत म्हणजे वयाची अकरा वर्षेमाढ्यात होतो. माढ्याला आमचे शेत होते. मी जेव्हा जेव्हा शेताला जाई तेव्हा तेव्हा शेताला लागूनच वाहणाऱ्या 'मनकर्णिका' नदीवर हमखास जाई. या नदीवर जवळच बारा नाला नामक रेल्वेचा पूल आहे, त्या परिसरातील त-हेत-हेचे रंगीबिरंगी पक्षी पाहून मन उल्हसित होई. नदीकाठाने बऱ्याचवेळा ३-४ किमी. ची भटकंती करीत पक्षी पाहण्याचा छंदच लागला. त्याकाळात, साधारणतः १९६० च्या सुमारास माझ्याजवळील शेतातून एक-दोनदा माळढोक पाहिल्याचे स्मरते. पुढे शिक्षणासाठी सोलापूरी स्थायिक झाल्यावर मारुती चितमपल्ली, बी.एस. कुलकर्णी, भानू शिरधनकर यांचे पक्ष्यांवरील लिखाण वाचून व गणपतराव पागे (शिवशाही) यांच्या पक्ष्यांविषयीच्या आठवणी ऐकून माझा पक्षी निरीक्षणाचा प्रवास खऱ्या अर्थाने सुरु झाले. ते वेड इतकं की माझे एक काका स्व. विमलचंद्र गांधी गमतीनं म्हणायचे की सोलापूरात आकाशाकडे तोंड करुन सायकल मारीत चाललेलं कोण दिसलं की समाजयचं तो आमचा पक्षीवेडा निनाद. असो.

१९८५ ला ५ वे, १९९७ ला १६ वे तर आजचे३४ वे धरुन सोलापूर शहरात होणारे हे तिसरे संमेलन तर जिल्ह्यातील चौथे

(१९९४, पंढरपूर, चौदाये), महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेतर्फे आयोजित या संमेलनांमुळे युवकांसह सर्वसामान्यजणही पक्षी निरीक्षण करु लागले. आम्ही विहंग मंडळींनी १९९७ साली भरविलेल्या १६ व्या संमेलनात खा. मनेका गांधींच्या हस्ते प्रकाशित केलेल्या पक्षीसूचीत २७४+१ उपजातींची नोंद केली होती. अशा संमेलनांमुळे महाराष्ट्रभर पक्षी निरीक्षक वाढू लागले. तद्वतच सोलापूरातही पक्षी अभ्यासक वाढू लागले व या सर्व युवा पक्षी निरीक्षकांमुळे आज मी प्रकाशित करीत असलेल्या सोलापूर जिल्ह्याच्या सूचीत जवळ जवळ शंभर पक्ष्यांची भर पडली आहे. ती माझ्या तरुण पक्षिमित्रांच्या सहकार्यानेच

पक्षी व संबंधित नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन या कार्यात महाराष्ट्र पक्षिमित्र संघटना चळवळ महत्वाची भूमिका बजावत पुढे जात असताना आपल्या चळवळीचे प्रणेते, मार्गदर्शक, कार्यकर्तेम्हणून काम केलेल्या सुहृदांची आठवण येणे साहजिकच आहे. प्रणेते प्रकाश गोळे, रमेश लाडखेडकर, चळवळीचे नेतृत्व नंतरच्या काळात केलेले डॉ. विडये, डॉ. विजय आंबेडकर, उल्हास राणे, ठाण्याचे कागदी पक्षी कलाकृती तज्ञ हेमकांत गुप्ते, प्रा.प्र.वा. सोमण इ. आज आपल्यात नाहीत. या सर्वाप्रति त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल आपण कृतज्ञच राहिले पाहिजे. ही चळवळ या सर्वाच्या योगदानासाठी व पक्ष्यांच्या भल्यासाठी सकारात्मकरित्या पुढे नेऊयात. आज आपल्यात नसलेल्या या सर्वाना विनम्र अभिवादन.

मध्यंतरी संमेलनांनी थोडी विश्रांती घेतली. संमेलन कक्षा विस्तारण्यासाठी, तसेच ही चळवळ अधिक कार्यप्रवण, फलदायी कशी करता येईल. यावर विचार मंथन करण्यासाठी थोडं थांबावं लागलं. यानंतर मात्र संमेलनाने नव्या दम्याने भरारी घेतली. उत्तरोत्तर पर्यावरणीय जाणीवा संमेलनातून प्रगल्भ होताना दिसू लागल्या. युवा पक्षी निरीक्षक मनापासून सामील होऊ लागल्याने चळवळीस एक शाश्वत अधिष्ठान मिळाले आहे.आज बरीच आव्हाने पक्षिमित्रांसमोर आहेत, ज्यामुळे जैविक विविधता कमी होऊ लागली आहे, इतर घटकाप्रमाणेच पक्ष्यांवरही याचे गंभीर परिणाम होऊ लागले आहेत.

पर्यावरण शास्त्रज्ञ एडवर्ड विल्सनने, ही आव्हाने (जैविक विविधतेला होणारे धोके) एका HIPPO या शब्दात कथिली आहेत. H-Habital Destruction (अधिवास नाश) १-Invasive Species (अयोग्य वृक्षांचे चुकीचे स्थानी रोपण) P-Pollution (प्रदूषण) P-Population Explosion (लोकसंख्या विस्फोट) O-Over Harvesting (Over Exploitation of sp) (कृषिक्षेत्राची अनिर्वध वाढ) थोडक्यात काय तर माननिर्मित अधिवास नाश, पर्यावरण प्रदुषण, विदेशी वृक्ष लागवड, वनविनाश, वन्यजीव शिकार, अतिचराई, अतिफोटोग्राफी इत्यादीमुळे सर्वच जीवसृष्टीवर संकट आले आहे. पर्यावरण संतुलनासाठी जैविक विविधता टिकून राहणे गरजेचे आहे.

दशकूपसमा वापी, दशवापीसमा ह्रदः। दशह्रदसमा पुत्रो, दशपुत्रासमा द्रुमः। (दहा विहिरीसमान एक बावडी तर दहा बावडी समान एक तलाव असतो। दहा तलावासमान एक पुत्र तर दहा पुत्रासमान एक वृक्ष असतो)

दोघांसाठी विविध निधीसह प्रकल्प कार्यरत आहेत. पण तणमोरांची संख्या त्याहूनही कमी असूनही थोड्याच प्रमाणावर संवर्धनासाठी प्रयत्न केले जातात. (Dr. Nigel Collar २५/१/२०२१) यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी आपण त्यादृष्टीने लक्ष घातले पाहिजे. अन्यथा तणमोर २० वर्षात नामशेष होईल. हे उपस्थित करण्याचे एक कारण म्हणजे गेल्या काही वर्षातून सोलापूरात अधून मधून झालेले तणमोराचे दर्शन. भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवामुळे हा आश्रयास आला होता. एकंदरीतच सर्वच वन्यजीवांना कुत्र्यांपासून धोका दाढत आहे. याविषयी काही पावले उचलावित. पंढरपूर, रेवदंडा अशा ग्रामीण भागात संमेलने चांगली पार पडली आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात आणखी संमेलने आयोजित केली जावीत. गावाकडील मंडळीही पक्षी संरक्षक असतात. अशी अनेक उदाहरणे आहेत. त्यापैकी एक म्हणजे कर्नाटकातील कोकरे वेलूर. आपणापैकी बरेच जण तेथे जाऊन आला असालच. तर दुसरे एक फार जुने उदाहरण (जरी अधिकृतरित्या मान्यता १९३६) म्हणून ओळखले जाणारे वेदाथंगल पक्षी अभयारण्य. दीडशे वर्षांपूर्वीची नोंद आहे की तेथील गावकऱ्यांना पक्ष्यांच्या ग्यानो (विष्ठा) मुळे भरघोस पीक येते, ह्याची माहिती असल्याने ते अभयारण्यात येणाऱ्या पक्ष्यांचे रक्षण करीत. जेव्हा काही ब्रिटीश सैनिक पक्ष्यांची शिकार करताना आढळले तेव्हा गावकऱ्यांनी त्यावेळचे चिंगलपेटचे कलेक्टर मि. प्लेस यांचेकडे तक्रार केली व कलेक्टरनी तेथे शिकारीस बंदी घातली. आता सोलापूरजवळील बाळे गावातील गावकऱ्याचे निरीक्षण-अप्पा तोडकरी यांच्या शेतात गरुडाचे घरटे पाहण्यासाठी मी व बाबा

गायकवाड गेलो असता, भोरड्यांचे थवे पाहून त्यांना विचारले यांचा त्रास होतो काय? तेव्हा अप्पा म्हणाले अहो भोरड्यामुळे हरभन्याचे पीक भरघोस आले, कारण त्यावरील घाटेअळीचा त्यांनी पार फडशा पाडला आहे. सांगायचा मुद्दा हा की गावकरीही आपल्या पक्षी संरक्षण, संवर्धन कार्यात महत्वाचे आहेत.

महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेच्या इतिहासात प्रथमच आम्ही विहग मंडळाने आयोजित (१६ व्या) संमेलन शुल्कातून काही रक्कम संघटनेस देण्याची योजना राबविली. अशा तरतुदीमुळे निधी उपलब्ध होऊ लागल्याने संघटना रजिस्ट्रेशन, त्रैमासिक पक्षिमित्र मुखपत्र अशा गोष्टी साध्य झाल्या. या मुखपत्रातून पक्ष्यावर कसदार लिखाण प्रकाशित व्हाये व त्याचा दर्जेदार संदर्भ साहित्य म्हणून लौकिक व्हावा यादृष्टीने आपली पावले पडत आहेत. पक्षिमित्रांनी त्यादृष्टीने कार्यरत व्हावे.जाता जाता सोलापूरच्या काही पक्षीतीर्था विषयी – १५० वर्षे जुना असलेल्या हिप्परगा तलावाची पक्षी–संपत्ती विलक्षण होती. लाखोंनी बदके व पाणपक्षी आम्ही पाहिलेत. आम्ही विहंग मंडळींनी तेथील रेस्ट हाऊसमध्ये निवासी निसर्ग शिबिरे घेऊन ही पक्षीसंपदा दाखविली. आज ही श्रीमंती कमी झाली असली तरी वैविध्य टिकून आहे. हिप्परग्यास गतवैभव (पक्ष्यांबाबत) परत आणण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. सिध्देश्वर दन विहार दोनशे दहा हेक्टरवर पसरलेले शहरातील हे वैशिष्ट्यपूर्ण निसर्गस्थळ पक्ष्यांनी समृध्द आहे. मी वनखात्यातर्फे १९३ पक्ष्यांची पक्षी सुची प्रसिध्द केली आहे. पक्ष्यांबरोबरच जैविक विविधतेने नटलेले हे स्थळ म्हणजे सोलापूरचे एक ॲसेट (Asset) आहे. सोलापूरच्या लगत असलेली गंगेवाडी, बोरामणी, नान्नज–मार्डी आदी माळराने तर शिकारी पक्षी व माळपक्षी यांची रेलचेल असणारी समृद्ध परिसंस्था आहे.

अशा सोलापूरचे पक्षी वैभव अनुभवा. पक्षी संवर्धन व संरक्षण यांची उर्मि व ऊर्जा आपणास या संमेलनातून मिळेल असा विश्वास वाटतो. एकच सांगणं – सर्व पक्ष्यांचे अधिवास जपा अन्यथा कुठले पक्षी? पक्षी नाहीतर पक्षी निरीक्षण नाही, मग पक्षिमित्र तरी कुठून असणार? आणि पक्षिमित्रांविना पक्षी संमेलने तर कशी भरणार? विचार करा. सर्वांना धन्यवाद.

*****

## प्रपत्र : IV

| | | | |
|---|---|---|---|
| १) | **प्रकाशन स्थळ** | : | महाराष्ट्र पक्षीमित्र, ६३, अरण्यार्पण, समता कॉलनी, कठोरा रोड, अमरावती. महाराष्ट्र. पीन कोड नं. : पीन : ४४४६०४. |
| २) | **प्रकाशन कालावधी** | : | त्रैमासिक |
| ३) | **मुद्रक** | : | श्री. जगदिश डी. सुकलकर (ज्ञानपथ प्रिंटर्स आणी ग्राफिक्स) पत्ता : वि.एम.वी.रोड, अमरावती. |
| ४) | **प्रकाशक** | : | डॉ. जयंत वडतकर (अध्यक्ष), महाराष्ट्र पक्षीमित्र |
| | **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| | **पत्ता** | : | ४२, ग्रीन पार्क कॉलनी, आशियानाजवळ, शेगाव रोड, अमरावती. पीन : ४४४६०४. |
| ५) | **संपादक** | : | श्री.दिगंबर गाडगीळ |
| | **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| | **पत्ता** | : | ३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक.महाराष्ट्र. पीन कोड नं. : ४२२००५. |

मी, जयंत सुधाकरराव वडतकर जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीनुसार बरोबर व खरी आहे.

दिनांक : १ एप्रिल २०२२

सही/–

**जयंत सुधाकरराव वडतकर**

**The State of wildlife and Protected area in Maharashtra (1996-2015)**
**हे 'कल्पवृक्ष'ने प्रकाशित केलेले पुस्तक प्राप्त होऊ शकेल.**
**संपर्क : psekhsaria@gmail.com**

# जे वनात तेच गावात तेच शहरात तेच मनात

–रेवन योगेश चौधरी
revanchaudhari2220gmail.com
8329020726

उध्वस्त झालेले जंगल म्हणजेच आजचे आपले शहर, आपलं अस्तित्व गमावून बसलेली ही भूमी आज जागतिक विकासाची साक्षी बनली आहे. खरं तर एक माणूस म्हणून मी विकासाला नाकारू नाही शकत. किंबहुना आपण कोणीही नाकारू नाही शकत. परंतु या कदाचित प्रकृतीच्या मूळ भावना असू शकतात. विकास मानवाला जरी गरजेचा असला तरी आज पर्यावरणाचे नुकसान आणि पर्यावरण संवर्धन यांचा काही मेळ बसत नाही किंबहुना पर्यावरणाची हानी संवर्धनापेक्षा कित्येक पटीने जास्तच आहे हे उघड सत्य आपल्याला स्वीकारावं लागेल.

आपल्या दिनचर्येतले दोन नित्य क्रियांचं उदाहरण घेतलं तर असं लक्षात येतं की रोजच्या आंघोळीमुळे, कपडे धुण्यामुळे पाण्यात होणारे प्रदूषण व लोकसंख्येचा विचार करता रोज किती जलप्रदूषण होत असेल याचा अंदाज लावणे कठीण आहे. बरं आता हे जे प्रदूषण आहे याला आपण व्यक्तिगत पातळीवर आटोक्यात आणण्याचा किती प्रयत्न करतो हाही एक मोठा प्रश्न आहे.

खरंतर वन, शहर, गाव किंवा आपले अंगण हे भिन्न आहे, असा फरकच नाहीसा झाला तर? वनांचा व शहरांचा संबंध लावता आत्म्याने परमात्म्याचा केलेला शोध असंच काहीसं असतं आज आपले शहर त्याची गमावून बसलेली अस्मिता परत मिळवण्यासाठी आतुर आहे, आपले शहर आपल्याला आज प्रश्न विचारते की, मी वनापासून वेगळा कैसा? जी संपदा वनांमध्ये आहे ती माझ्याकडे का नाही? वनातल्या वन्यजीवांना आज शहरांमध्ये का जागा नाही? या सगळ्या प्रश्नांचे प्रात्यक्षिक म्हणजे मानव आणि वन्यजीवांमध्ये होते चाललेला संघर्ष. खरंतर आपण जंगलातल्या आत्म्याशी प्रत्येक श्वासात जुळलेले असतो परंतु आपल्याला याचा विसर पडतो आणि स्वत:शिवाय मानवाला इतर कुठलीही प्रजाती त्याच्या जवळपास नको असते.

खरंतर संवर्धनाची गरज जेवढी जंगलांना आहे तेवढीच शहर एवम गावांनाही. हे मान्य आहे की मोठे शिकारी प्राणी यांना शहरात जागा नाही कारण असे झाल्यास दोघांच्याही जिवाला धोका असतो परंतु पक्षी, कीटक, फुलपाखरे काही सरपटणारे जीव व काही शांत स्वभावाचे प्राणी जे मानवी वस्ती जवळ स्वत:चं अस्तित्व टिकवू शकतात अशा प्राण्यांच्या संवर्धनासाठी शहरांमध्ये गावांमध्ये एवम शहरांलगत असलेल्या फ्रॅगमेन्टेड फॉरेस्ट पॅचमध्ये जास्तीत जास्त लक्ष द्यायला हवे. त्यांच्या संवर्धनासाठी हव्या त्या सुधारणा, बदल एवं जागरूकता नागरिकांपर्यंत पोहोचवायला हव्यात. जसे स्थानिक वनस्पतींचे वृक्षारोपण, वन्यजीवांच्या जीवनशैलीचा अभ्यास, त्यांना असणारे धोके, त्यांच्या शास्त्रीय नोंदी, शहरात असलेले तलाव नदी–नाले, पार्क, धरण, गार्डन यावर जेवढा आपला अधिकार आहे आहे तेवढाच या वन्यजीवांचाही! ही गोष्ट प्रत्येक नागरिकाच्या लक्षात आली पाहिजे व त्या दृष्टिकोनातून प्रत्येक नागरिकाने आपली संवेदनशीलता दाखविली पाहिजे, शहरात असलेल्या वन्यजीवांची ओळख नागरिकांना असणे हा इथे एक महत्त्वाचा मुद्दा ठरतो. या दृष्टिकोनातून शालेय विद्यार्थ्यांना शहरी वन्यजीवांची ओळख व या विषयाची गोडी लावायला हवी.

म्हणजे एखाद्या शहराची ओळख तिथं संवर्धित असलेल्या वन्यजीवनावरून झाली तर किती छान होणार! उदाहरणार्थ एखाद्या शहराला दुर्मीळ वनस्पतींचे शहर म्हणून ओळखले गेले, एखाद्या शहरात तिथे असलेल्या एखादाच दुर्मीळ वन्यजीव यामुळे मिळालेली ओळख, जसे बंगळुरू शहराला स्प्लेंडर लोरीसमुळे मिळालेली विशेष ओळख. या अशा घटनांची सध्या आपल्याला सगळ्यात जास्त गरज आहे कारण याचमुळे आपण पर्यावरणाचे नुकसान एवम त्याचे संवर्धन यामध्ये काहीतरी ताळमेळ आणू शकतो आणि म्हणूनच म्हटलं जे वनात तेच गावात तेच शहरात आणि तेच मनात.

*****

# टपाल तिकिटांच्या दुनियेत

## Jacanas कमळपक्षी

कमळपक्षी कुलातील दोन जाती आपल्याकडे सापडतात

Bronze-Winged Jacana (*Metopidius indicus*)
कांस्यपंखी कमळपक्षी

हा पाणथळ पक्षी बराचसा पाणकोंबडीच्या वळणाचा आहे. त्याचे डोके, मानवी छाती चकाकणाऱ्या काळया रंगाची असते. हिरवट ब्राँझ रंगाची पाठ व पंख असतात तर चेस्टनट तांबड्या रंगाचे भुंडे शेपुट असते. डोळ्याच्या पाठीमागून मानेपर्यंत गेलेली पांढरी पट्टी उठून दिसते. या पक्ष्याचे पाय, पायाची बोटे व नखे मोठ्ठी असतात, जेणेकरून यांना तरंगत्या पाण वनस्पतींवर किंवा तरंगत्या पानांवर चालता येते.

Pheasant-Tailed Jacana (*Hydrophasianus chirugrusus*)
गडद विटकरी पंखाखालील विस्तृत पांढरा भाग, मानेवरील पिवळा पट्टा, मुखमंडलापासून छातीपर्यंत पांढरा रंग व चोच लांब व टोकदार कोयत्याच्या आकाराची असते. म्हणून सहज वेगळा ओळखता येतो. विणीच्या काळातली कमानदार वक्र लांब शेपटीमुळे त्याचे सौंदर्य उठून दिसते.

दोन्ही जातीतील मादीचे अनेक सहचर असतात. एका नराबरोबर समागम करून ती अंडी घालून मोकळी होते. अंड्याचे उबविणे व पिलांची निगा राखणे हे काम संपूर्णपणे नरावर सोपवून ती दुसऱ्या नराकडे जाते व अशा प्रकारे ती एका मागोमाग एक असे अनेक घरोबे करते. शिंगाडा किंवा इतर तरंगणाऱ्या वनस्पतीच्या पानावर वेड्या वाकड्या फांद्याचे घरटे बांधले जाते. मादी एका वेळी चकचकीत हिरवट तपकिरी रंगाची चार अंडी घालते. पाणथळीतील पाणवनस्पती, पाण कीटक, गोगलगाई, शंख व शिंपले हे त्यांचे आवडते खाद्य आहे.

आपल्या जातीवंत सौंदर्याने जलाशयाची शोभा वाढवणारे हे रूपवान पक्षी निरीक्षण करण्यात एक वेगळाच आनंद आपणास मिळतो. म्हणूनच थायलंड सरकारच्या टपाल विभागातर्फे या दोन्ही कमळ पक्ष्यांवर आकर्षक तिकिटे प्रकाशित केली आहेत.

**रवींद्र वामनाचार्य,**
नाशिक
मोबाईल नं. : ९८९०३९०५२७
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

*****



## स्वागत नवीन सभासदांचे

( दि. ०१ ऑक्टोबर२०२१ ते ३१ मार्च २०२२)

| Membership No. | Name of Member | Place | Membership No. | Name of Member | Place |
|---|---|---|---|---|---|
| 1298 | Mrs. Megha S. Surve | Mumbai | 1332 | Mr.Siddharth D. Sonawane | Beed |
| 1299 | Dr. Minakshi N. Gurav | Panvel | 1333 | Mr.Bharti R. Dhonde Patil | Navi Mumbai |
| 1300 | Mr. Santosh D. Udare | Panvel | 1334 | Dr. Mahananda B. Bagale | Solapur |
| 1301 | Mr. Saphal U Patil | Amravati | 1335 | Mr. Gajanan R. Salunke | Pune |
| 1302 | Mr. Kiran Kulkarni | Mumbai | 1336 | Dr. Dhananjay V. Shah | Solapur |
| 1303 | Mr. Sanjay R. Parikh | Mumbai | 337 | Mr. Yashwant N. Sadul | Solapur |
| 1304 | Mrs. Anju Vaidya | Nagpur | 1338 | Smt. Sujata Humne | Pune |
| 1305 | Ku. Sapnaja A. Dalvi | Solapur | 1339 | Dr. Uttam S. Salwe | Beed |
| 1306 | Mr. Avinash S. Phatak | Pune | 1340 | Mr. Amol B. Dongre | Nashik |
| 1307 | Mr. Ajit. S. Kashikar | New Mumbai | 1340 | Mr. Raju D. Raybaan | Solapur |
| 1308 | Mr. Aniket B. Patil | Sangli | 1342 | Mr. Suryakant S. Bankar | Pandharpur |
| 1309 | Sau. Swati Vanjari Kaitke | Mumbai | 1343 | Mr. Shripad D. Dunakhe | Solapur |
| 1310 | Mrs. Sujata Milind Babar | Nashik | 1344 | Dr. Pradeep V. Kasture | Solapur |
| 1311 | Mr. Chandrakant J. Mane | Sangli | 1345 | Mr. Ajay B. Naygaonkar | Solapur |
| 1312 | Mr. Nitin Bhoir | Mumbai | 1346 | Mrs. Amruta S. Sutrave | Solapur |
| 1313 | Mr. Akshay K. Gaware | Pune | 1347 | Miss. Pooja A.Mali | Solapur |
| 1314 | Mr. Sanjay K. Pawar | Amravati | 1348 | Prof. Ganesh V. Lengare | Solapur |
| 1315 | Mr. Ashok D. Pokharkar | Kalyan, Thane | 1349 | Mr.Mallikarjun R. Bhusare | Solapur |
| 1316 | Dr. Shivaji P. Chavan | Nanded | 1350 | Mr. Parshuram A. Kokane | Solapur |
| 1317 | Dr. Madhav K. Puranik | Pune | 1351 | Mr. Sachin A. Mhaske | Mehkar |
| 1318 | Mr. Prasant V. Kasabe | Pune | 1352 | Mr. Nikhil S. Dhage | Nanded |
| 1319 | Mr. Sachin C. Vaidya | Nashik | 1353 | Mr. Vikram A. Gupchup | Pune |
| 1320 | Dr. Suresh J. Bhosale | Karad, Satara | 1354 | Mr. Rajesh S. Shinde | Nashik |
| 1321 | Mr. Nitin Z. Patil | Pune | 1355 | Mr. Ambadas V. Kankatti | Solapur |
| 1322 | Dr. Ashvin G. Lunge | Morshi, Amravati | 1356 | Mr. Ketan P. Allapurkar | Pandharpur |
| 1323 | Mr. Shahid Farid Jamadar | Akkalkot | 1357 | Miss. Clara Correia | Thane |
| 1324 | Mr. Manik V. Akmar | Washim | 1358 | Mr. Sumit S. Wankhade | Amravati |
| 1325 | Mr.Nikhil A. Borode | Nagbhid | 1359 | Prof. Ashish U Ghaware | Amravati |
| 1326 | Mr.Milind Bengali | Mumbai | 1360 | Mr. Sushant S. Chavhan | Nanded |
| 1327 | Mr.Shivaji S. Survase | Solapur | 1361 | Dr. Anuprita Turvankar | Pune |
| 1328 | Mr.Vinod A. Kamatkar | Solapur | 1362 | Mr. Onam V. Tirmare | Amravati |
| 1329 | Mr.Vinod N. Kabnurkar | Pune | 1363 | Mr. Krishnendu Sarkar | Pune |
| 1330 | Mr.Sandip J. Bagal | Dhule | 1364 | Miss. Chai Eng Law | Kolkata |
| 1331 | Mr.Shrirang S. Regoti | Solapur | | | |

## महाराष्ट्र पक्षिमित्र विभागवार समन्वयक

| अ.क्र. | विभाग | विभागीय समन्वयक | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|
| ०१ | विदर्भ (नागपूर विभाग) | श्री. राहुल वकारे (वर्धा) | ९७६६३०९७९२ |
| ०२ | विदर्भ (अमरावती विभाग) | श्री. अमोल सावंत (अकोला) | ९८२२७२८८२३ |
| ०३ | उत्तर महाराष्ट्र (नाशिक) | श्री. अभय उजागरे (जळगाव) | ९८२३७७३९७९ |
| ०४ | पश्चिम महाराष्ट्र (पुणे विभाग) | श्री. सि. ना. पुराणिक (सोलापूर) | ९८५०५०३८०१ |
| ०५ | मराठवाडा (औरंगाबाद) | श्री. महेंद्र देशमुख (औरंगाबाद) | ९४२१७४६६५० |
| ०६ | कोकण (मुंबई) | श्री. अविनाश भगत (ठाणे) | ९८९२०६१८९९ |

## महाराष्ट्र पक्षिमित्र जिल्हा समन्वयक

### (विदर्भ) नागपूर विभाग

| एकूण जिल्हे | जिल्ह्याचे ठिकाण | जिल्हा समन्वयक यांचे नाव संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| १. | नागपूर | श्री. आनंद कानडे ९९६०३२०२५२ |
| २. | वर्धा | श्री. दीपक गुढेकर ९४२३१२०७४१ |
| ३. | चंद्रपूर | श्री. रुंदन काटकर ९५९५५६०६२५ |
| ४. | भंडारा | श्री. शाहीद परवेज खान ९४२३४१४७७३ |
| ५. | गोंदिया | श्री. मुकुंद धुर्वे ९९६०१४४५०५ |
| ६. | गडचिरोली | श्री. दीपक वांढरे ९६०४१९३७६० |

### (विदर्भ) अमरावती

| एकूण जिल्हे | जिल्ह्याचे ठिकाण | जिल्हा समन्वयक यांचे नाव संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| १. | अमरावती | श्री.सौरभ जवंजाळ ९६८९३८३९४० |
| २. | अकोला | प्रा.डॉ.मिलिंद शिरभाते ९६५७७३१११८ |
| ३. | बुलडाणा | श्री.सचिन कापुरे ८८८८१८८५०८ |
| ४. | यवतमाळ | श्री. दत्तात्रय पाईकराव ९६६५८६८७०३ |
| ५. | वाशीम | श्री. मिलिंद सावदेकर ९८६०१८२२८२ |

### (पश्चिम महाराष्ट्र) पुणे विभाग

| एकूण जिल्हे | जिल्ह्याचे ठिकाण | जिल्हा समन्वयक यांचे नाव संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| १. | पुणे | श्री. निखील ढगे ८४६८९७७५२० |
| २. | सातारा | रिक्त |
| ३. | सांगली | रिक्त |
| ४. | कोल्हापूर | श्री. युवराज पाटील ९२७३०६४५०० |
| ५. | सोलापूर | श्री. नरेंद्र गायकवाड ९०४९५५०१९० |

### (मराठवाडा) औरंगाबाद विभाग

| एकूण जिल्हे | जिल्ह्याचे ठिकाण | जिल्हा समन्वयक यांचे नाव संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| १. | औरंगाबाद | श्री. नागेश देशपांडे ९४२९४९९३८३ |
| २. | जालना | श्री. विलास सवडे ९४२१६६५९९९ |
| ३. | परभणी | श्री. अनिल उरटवाड ८७९३५५८३१० |
| ४. | हिंगोली | श्री. विनायक अ. दयाळ ९०२८९०६१८१ |
| ५. | नांदेड | प्रा.डॉ.शिवाजी चव्हाण ९४२१०४६३७२ |
| ६. | बीड | श्री. हेमंत धानोरकर ९९६००९६०६२ |
| ७. | लातूर | श्री. धनंजय गुट्टे ८८५५८०३१०० |
| ८. | उस्मानाबाद | रिक्त |

### (उत्तर महाराष्ट्र) नाशिक विभाग

| एकूण जिल्हे | जिल्ह्याचे ठिकाण | जिल्हा समन्वयक यांचे नाव संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| १. | नाशिक | श्री.मधुकर जगताप ९४२२०५७५०३ |
| २. | जळगाव | श्री.उदय चौधरी ९३२६०९७३३९ |
| ३. | नंदुरबार | रिक्त |
| ४. | धुळे | डॉ.विनोद भागवत ९४२२२३८५२३ |
| ५. | अहमदनगर | श्री.ऋषिकेश लांडे ९२२५३२४१९० |

### (कोकण) मुंबई विभाग

| एकूण जिल्हे | जिल्ह्याचे ठिकाण | जिल्हा समन्वयक यांचे नाव संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| १. | मुंबई शहर | श्री.नंदकिशोर दुधे ७६२०१९३२०७ |
| २. | मुंबई उपनगर | प्राचार्य मेघा सुर्वे ९१६७६६८१५१ |
| ३. | ठाणे | कु.ललिता आष्टेकर पोयरेकर ९८६७५९२१०८ |
| ४. | पालघर | श्री.आशिष बाबरे ७७९८८२७१९९ |
| ५. | रायगड | श्री. योगेश गुरव ८८८८२३२३८३ |
| ६. | रत्नागिरी | रिक्त |
| ७. | सिंधुदुर्ग | डॉ. गणेश मर्गज सावंतवाडी ९७६३४६८६२५ |

## भावपुर्ण श्रद्धांजली



महाराष्ट्र पक्षिमित्र चे आजीवन सदस्य, प्रसिद्ध पक्षी संशोधन व निसर्ग संवर्धनासाठी धडपडणारा युवा कार्यकर्ता धर्मराज पाटील यांचे दि. १ मार्च रोजी दुःखद निधन झाले. धर्मराजच्या जाण्यामुळे पर्यावरणाच्या लढाईतील एक खंदा कार्यकर्ता यानिमित्ताने आपण गमावला. पर्यावरण संबंधित अनेक उपक्रमात तो तज्ज्ञ म्हणून सहभागी होत असे. विविध विषयावर धर्मराजने अनेक व्याख्याने घेतली व अनेकांना अमुल्य मार्गदर्शन केले आहे. तो मुळा - मुठा संगमावरचे सलीम अली पक्षी अभयारण्य वाचवण्यासाठी आंदोलन करत होता. त्याने दुर्मिळ रानपिंगळ्याचे आधिवास शोधून काढले होते.

**धर्मराज पाटील यांना महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.**

## भावपुर्ण श्रद्धांजली



आपले एक सभासद व पालघर जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक श्री. धवलभाई कन्सारा यांचे अगदी तरुणपणी ४ फेब्रुवारी २०२२ रोजी ह्रदयविकाराच्या झटक्याने आकस्मिक निधन झाले. या उमध्या तरुण पक्षिमित्रास वन्यजीवनाची अतोनात आवड होती.

**धवलभाईंना महाराष्ट्र पक्षिमित्रतर्फे श्रद्धांजली.**

### आपल्या माहितीला उजाळा प्रश्नांची उत्तरे -

१) ३१ मे, २) Bucerotidae, ३) मोर, ४) टिबुकली, ५) डर्बन, ६) टेरिलोग्राफी, ७) कोकीळ, ८) रंगीत पाणलावा, ९) कैकर, १०) निकोलस टीनबरजेंट

**Book Post**

प्रती,

प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षिमित्र**
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*
*Mob.+91 7030101981*

**पक्षिमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : गौरी एंटरप्राइजेस, नाशिक